उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने


WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३०४ ■ गुरुवार ६ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## विजयी केले ते दुसऱ्याच पक्षात विलीन होतात लोकशाही मुल्यांचे रक्षण कसे होणार : सिब्बल



**नवी दिल्ली, दि. ५ : आपल्या लोकशाहीच्या भविष्याबाबतचा हा मुख्य प्रश्न आहे. लोकशाहीच्या चौकटीत अशा प्रकारची कारवाई अजिबात मान्य आहे की नाही, याचा निर्णय तुम्हाला घ्यावा लागेल. तिथे सर्वकाही आधीच ठरवून झाले होते. कोणताही योग्य निर्णय घेतला गेला नाही. आपल्या देशाच्या राजकीय व्यवस्थेवर याचा प्रचंड मोठा परिणाम होत आहे. आता ही पद्धत सर्वत्र रूढ होत चालली आहे. लोकशाही मूल्यांचे रक्षण कसे करायचे, हे आता तुम्हालाच ठरवावे लागेल, अशा शब्दात ज्येष्ठ विधिज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली. यावेळी कपिल सिब्बल देशभरात सुरु असलेल्या फोडाफोडीचा दाखला सुद्धा सर्वोच्च न्यायालयाच्या नजरेस आणून दिला.**

विधिमंडळ पक्षच थेट दुसऱ्या राजकीय पक्षात विलीन होत आहेत, या पार्श्वभूमीवर कपिल सिब्बल म्हणाले, आता तर विधिमंडळ पक्ष थेट दुसऱ्या राजकीय पक्षात विलीन होत आहेत. एका चिन्हावर निवडणूक लढवून दुसऱ्याच पक्षाचे प्रतिनिधित्व करत आहेत. या प्रकारचा भोंगळपणा आता एका वेगळ्याच हास्यास्पद स्तरावर पोहोचला आहे. यामुळे निवडणुकीची संपूर्ण प्रक्रियाच एक थट्टा बनून राहिली आहे. कारण, अशा प्रकारच्या फेरफार आणि पक्षांतरामुळे जनतेने दिलेला कौल बदलला जाऊ शकतो. त्यामुळे लोकांनी ज्यांना निवडून दिले किंवा ज्यांच्यासाठी मतदान केले, ते सरकार सत्तेत राहतच नाही.

निवडणूक चिन्ह,राजकीय पक्षाचे असते

ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सांगितले की, निवडणूक चिन्ह हे राजकीय पक्षाचे असते. विधिमंडळ पक्षाचे नाही. कारण, निवडणूक आयोग पक्षाला चिन्ह देतो. पक्षाने अधिकृत पत्र दिल्याशिवाय कोणीही उमेदवारी अर्ज भरू शकत नाही. आमदारांनी भाजपशी हातमिळवणी करून सरकार पाडले. एकनाथ शिंदेंनी स्वतः सांगितले होते की, त्यांना एका मोठ्या राष्ट्रीय पक्षाचा पाठिंबा आहे. ज्या पद्धतीने सरकार पाडले गेले आणि नवे सरकार स्थापन झाल (पान ४ वर)

## एसआयआरला १७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय

मुंबई, दि. ५ : राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात सरासरी ७५ टक्के एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली असून मुंबई, ठाणे सारख्या भागातील डिजिटायझेशनचे प्रमाण पन्नास टक्क्यांच्या आसपास आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांमार्फत भारत निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने राज्यातील सर्व निवडणूक अधिकारी, जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना सुधारित वेळापत्रकाची तत्काळ माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनाही सुधारित कार्यक्रमाची लेखी माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, नव्या मतदारांची (पान ४ वर)

## सीजेपी राजकीय पक्ष म्हणून काम करणार नाही देशात दबाब गट म्हणून काम करणार - दिपके

**संभाजीनगर, दि. ५ : देशातील सद्य राजकीय परिस्थिती, न्यायव्यवस्था, मिडीया आणि निवडणूक आयोग यांसारख्या महत्त्वाच्या संस्थाच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होत आहेत. या संस्थांवरील लोकांचा विश्वास उडाल्याचे जंतर-मंतर, बंगाल, मुंबई आणि चेन्नईसह देशभरात स्पष्टपणे दिसून आला आहे. देशात उभी राहणारी ही चळवळ आता सामाजिक चळवळ ठरत आहे. त्यामुळे संस्थांमधील निष्पक्षता आणि उत्तरदायित्व पुनरुज्जिवीत करण्यासाठी देशव्यापी चळवळीची गरज आहे. त्यामुळे राजकीय पक्ष आम्ही काढणार नाही. मात्र, देशभरात दवाबगट म्हणून काम करणार असल्याचे स्पष्टीकरण कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजित दिपके यांनी आज**



**प्रसार माध्यमांना सांगितले. आज सकाळी अकराच्या सुमारास दिपके यांच्या घरी बैठक झाली. या बैठकीला पार्टीचे प्रवक्ते सौरभ दास, यतीन गोयल, वैष्णवी गौर, रत्ना सिंग, अक्षय मराठे, अजिंक्य शिंदे आणि आशुतोष रंका, अनिकेत भारद्वाज, दीपक बनियानो, विजय मल्लागी हे पदाधिकारी उपस्थित होते.**

दिल्लीतील आंदोलनाच्या यशानंतर आज सकाळी कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजत दिपके यांच्या येथील निवासस्थानी त्यांच्या सोबत असणाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांना माहिती देताना दिपके म्हणाले की, आमच्यावर जबाबदारी वाढली असून आता संघटन देशभर वाढवायचे आहे. आमच्या यशामुळे आमच्याकडून अपेक्षा देखील वाढल्या आहेत. त्यामुळे देशभरात संघटन कसे वाढणार यावर अजून चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच झारखंडच्या विद्यार्थ्यांनाही आमचे समर्थन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आज राजकीय व्यवस्था अत्यंत खालावली आहे. जनता सकाळी एकाला मतदान करते आणि संध्याकाळी भलत्याचेच सरकार स्थापन होते. नागरिक ज्या पक्षाचा आमदार किंवा खासदार निवडतात, तो संध्याकाळपर्यंत दुसऱ्या पक्षात गेलेला दिसतो. मतदान डिलीट होण्याचे प्रकार घडतात. ईडी आणि सीबीआय सारख्या केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून राजकीय (पान ४ वर)

## साक्रीच्या गारपीट ग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्या राष्ट्रवादी श.प.गट व सेनेतर्फे निवेदन सादर

**साक्री, दि.५(प्रतिनिधी)- गेल्या उन्हाळ्यात मार्च महिन्यात साक्री तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली होती या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले होते, शेतकऱ्यांनी जवळपास चार महिने काबाडकष्ट करून उन्हाळी कांदा,मका,पपई,डाळिंब तसेच इतर पिकांचे संगोपन केले होते ऐन काढणीच्या वेळेस गारपीट झाली त्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांकडून हिरावला गेला,प्रचंड आर्थिक नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकरी अद्यापही भरपाई पासून वंचित आहे. नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी. या म**



**ागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे व शिवसेनेचे तालुका प्रमुख पंकज मराठे नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी व तालुक्यातील शेतकरी बांधवांनी साक्रीचे तहसीलदार सोनवणे यांना दिले.**

मार्च महिन्यात कावठे, भाडणे, पेरेजपूर, आष्टाने, छडवेल प. तसेच काटवान परिसरात व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली होती त्यामुळे शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांचे १००% टक्के नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे महसूल विभाग व कृषी विभागाच्या (पान ४ वर)

## एसटी-स्कुटीचा अपघात ज्ये.नागरिक जागीच ठार

दोंडाईचा, दि. ५(प्रतिनिधी)- दोंडाईचा -नंदुरबार मार्गावरील रामी फाट्याजवळ एसटी बस आणि स्कूटीच्या भीषण अपघातात ज्येष्ठ नागरिक रामदास बळीराम माळी (वय ७८, रा. सरस्वती नगर, दोंडाईचा) यांचा मृत्यू झाला.

रामदास माळी हे बुधवारी काम आटोपून टीव्हीएस स्कूटीने (एमएच १८/सीए- ६२३६) परतत असताना, रामी फाट्याजवळ नंदुरबारकडून येणाऱ्या एसटी बसने (एमएच २०/बीएल-३३९३) त्यांच्या स्कूटीला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या माळी यांना १०८ रुग्णवाहिकेद्वारे उपजिल्हा रुग्णालय, दोंडाईचा येथे दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित (पान ४ वर)

## विजय चौधरींकडून महिलांचा अपमान कारवाई करा अन्यथा आंदोलन- उबाठा

**नंदुरबार, दि.५(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यात व्हायरल झालेल्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणात आता नवीन वळण आले आहे. या क्लिपमध्ये नंदुरबार शहर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी दिपक गोरे यांनी भाजप पदाधिकारी विजय चौधरी यांच्याशी संवेदनशील विषयांवर चर्चा केल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन दिले.**



व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमध्ये दिपक गोरे हे हद्दपार प्रस्ताव, दारूबंदी आणि दारू तस्करी यासारख्या पोलीस खात्याशी संबंधित अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय माहिती भाजप नेते विजय चौधरी यांना देत असल्याचे ऑडिओ क्लिप मध्ये प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच भाजपचे माजी महामंत्री विजय चौधरी भाजप कार्यालयातून पोलीस स्टेशन चालते असे बोलताना आढळून आले. तसेच विजय चौधरी यांनी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे एकनाथराव खडसे, माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्या बद्दलही आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे त्यामुळे विजय चौधरी यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी तसेच पोलीस खात्याची माहिती बाहेर पुरवणाऱ्या संबंधित दिपक गोरे या (पान ४ वर)

## महामार्गावर एलजी ढाब्याजवळ बस अपघातात पंचवीस जखमी

धुळे, दि. ५ (प्रतिनिधी) : मुंबई-आग्रा महामार्गावर उत्तर प्रदेशातील भाविकांच्या बसचा भीषण अपघात झाला. त्यात सुमारे २५ जण कमी-अधिक प्रमाणात जखमी झाले. त्यांच्यावर शहरातील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. महामार्गावरील या भीषण अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक प्रशासन आणि महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्त वाहने बाजूला करत वाहतूक पूर्ववत केली आहे.

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन वरील एलजी ढाब्यासमोर आज पहाटे पाचच्या वाजेच्या सुमारास भीषण अपघात घडला. उत्तर प्रदेशातून इंदूर मार्गे त्र्यंबकेश्वर (पान ४ वर)

## बोरकुंडच्या भदाणे दाम्पत्याचा कारच्या धडकेत दुर्दैवी अंत

**धुळे, दि.५- बोरकुंड (ता. धुळे) येथील प्रगतिशील शेतकरी व श्री जनार्दन स्वामी कृषी सेवा केंद्राचे संचालक अशोक दिनकर भदाणे (वय ५८), त्यांच्या पत्नी लता अशोक भदाणे (वय ५२) यांचा भीषण अपघातात मृत्यू झाला. मंगळवारी रात्री घडलेल्या या घटनेने गावात शोककळा पसरली असून आज आठवडे बाजार पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. कार चालक अनुराग संजय ऐंडाइत याला मोहाडी पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.**

अशोक भदाणे, पत्नी लता भदाणेसह दुचाकीने (एम एच१८/एयु-९९५७) मंगळवारी (ता.४)



सायंकाळी सातच्या धुळ्याहून बोरकुंडकडे परतत होते. गरताड जवळील रेल्वे पुलावर त्यांच्या दुचाकीला कारने जोरदार धडक दिली. त्यात दोघेही गंभीर जखमी झाले. परिसरातील काहींनी धाव घेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असतानाच भदाणे दांपत्याचा मृत्यू झाला. अशोक भदाणे हे परिसरातील (पान ४ वर)

## तळोद्यात लाच घेताना अव्वल कारकून जाळ्यात

नंदुरबार, दि.५(प्रतिनिधी)- ३२एम नमुना प्रमाणपत्र देण्यासाठी ५,००० लाचेची मागणी करून ती स्वीकारताना तहसील कार्यालय, तळोदा येथील सहाय्यक महसूल अधिकारी (वर्ग-३) कार्यालयातील लिपिक (अव्वल कारकून) रविंद्र निंबा कानडे (वय ५२) याला नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसील कार्यालयाबाहेरील दुकानात करण्यात आली.

तक्रारदाराच्या पतकीच्या नावावरील शेतजमिनीच्या ३२ एम नमुना प्रमाणपत्रासाठी ५,००० लाचेची मागणी करण्यात आल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. ३ ऑगस्ट रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात(पान ४ वर)

## सेनेचे ता.प्रमुख हेंमत पाटलांसह सात जणांवर अॅट्रॉसिटीचा गुन्हा

**शिरपूर दि.५ (का.प्र.)- आदिवासी समाजाला उद्देशून बदनामीकारक वक्तव्य केल्याच्या संशयावरुन शिवसेनेच्या शिंदे गटाचे तालुकाप्रमुख हेमंत गुलाबराव पाटील यांच्यासह सात जणांवर अॅट्रॉसिटीसह विविध कलमांन्वये ४ ऑगस्टला रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.**

संबंधित महिलेने शहर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, १७ जुलैला सकाळी दहाला उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात व दुपारी एकला शहर पोलिस ठाण्याबाहेर मोर्चात संशयितांनी आदिवासी समाजाचा अवमान करण्याच्या उद्देशाने जाहीर वक्तव्ये केली. संशयितांमध्ये शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष हेमंत गुलाबराव पाटील (रा.पाटीलवाडा, शिरपूर), दहिवद (ता.शिरपूर) येथील ग्रामपंचायत सदस्य मयूर देवेंद्र राजपूत, कल्पेश सुभाषसिंह जमादार (राजपूत, रा.दादूसिंह कॉलनी, शिरपूर), अनुभव युवा मंचचे प्रवर्तक जितेंद्र धीरसिंह राठोड (रा.भाटपुरा ता.शिरपूर), शिवसेनेचे अल्पसंख्यांक विभागाचे पदाधिकारी सलमान नूरखान काझी (रा.शिरपूर), शिरपूर फर्स्ट संघटनेचे संस्थापक हंसराज प्रशांत चौधरी (रा. शिरपूर) व (पान ४ वर)

## आ.अग्रवालांच्या कार्यालयात चोरी

धुळे, दि.५- शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांच्या येथील मालेगाव रोडवरील एबी फाऊंडेशनच्या कार्यालयात चोरीचा प्रकार मध्यरात्री घडला. शहर पोलिसांच्या सतर्कतेने काही वेळातच उलगडा झाला असून चोरट्याला पोलिसांनी अटक केली.

शहरातील महापालिकेलगत गुरुशिष्य स्मारकाजवळ एक जण संशयितरित्या दिसून आला. पोलीस पथकाने त्याला थांबवण्याचा प्रयतक केला असता त्याने पळ काढला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करत मुख्य टपाल कार्यालयाजवळ त्याला ताब्यात पकडले. जावेद असे त्याचे नाव असून त्याने शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांच्या ए.बी. फाउंडेशन या वैद्यकीय मदत केंद्रात चोरी केल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी तपास सुरू आहे.

## देव मोगरा येथील महाराष्ट्र भवनाला गती; पंधरा को.च्या निधीची तरतूद

**नंदुरबार, दि.५(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्याच्या सीफेला लागून असलेल्या गुजरातमधील सागबारा येथील आराध्य दैवत देव मोगरा माता मंदिर परिसरात महाराष्ट्र भवन उभारण्याच्या प्रस्तावाला गती मिळाली आहे. या प्रकल्पासाठी पंधरा कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, त्यासंदर्भात आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली.**

बैठकीस आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी यांनी भवन निर्मितीसाठी विविध मुद्दे उपस्थित केले.यावेळी आदिवासी विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंदिर परिसरात महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, जागेची उपलब्धता आणि पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत मंदिर परिसरातील जागा महाराष्ट्र शासनाच्या नावावर हस्तांतरित करण्याबाबत किंवा ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबत चर्चा झाली. आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील तीन ते चार महिन्यांत होणाऱ्या बैठकीत महाराष्ट्र भवनाच्या प्रस्तावाला अंतिम मंजुरी देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. (पान ४ वर)

हार्दिक अभिष्टचिंतन !



मा.श्री.मिलींद पद्माकर मुडावदकर
(गव्ह.कॉन्ट्रॅक्टर)
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
श्री.शिवकुमार डोंगरे — श्री.गजानन कोतकर
डॉ.नैनेश देसले — डॉ.अमित चौधरी
श्री.कपील तनेजा — श्री.छत्रपाल भदाणे
डॉ.राजकिरण पटेल — श्री.स्वप्नील कोतकर
गजानन गृप, धुळे



## काँग्रेसचे सपकाळांच्या वक्तव्याचा निषेध राष्ट्रवादीतर्फे चप्पल मारो आंदोलन

**धुळे, दि.५- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने बुधवारी ८० फूटी रोडवरील हाजी अन्वर चौकात आंदोलन करण्यात आले. माजी आ.फारुख शाह यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळांच्या पोस्टरला चपलांनी मारून निषेध व्यक्त केला.**

यावेळी महिला जिल्हाध्यक्ष डॉ. दीपा नाईक यांनी बोलताना सांगितले महाराष्ट्र ही राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर आणि सावित्रीबाई फुले यांची पवित्र भूमी आहे. अशा भूमीत महिलांचा अवमान करणारे वक्तव्य सहन केले जाणार नाही. सपकाळ यांनी तात्काळ जाहीर माफी मागावी, अन्यथा धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांना प्रतीकात्मक स्वरूपात शेण, चप्पल आणि बांगड्यांचे पार्सल पाठवण्यात येईल तसेच मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला.

या आंदोलनात माजी आमदार फारुक शहा, माजी नगरसेवक कांतीलाल दाळवाले, नगरसेवक शहबाज शाह, नगरसेवक रफिक हाजी, जया साळुंखे, समीर खान, नगरसेवक रफिक शाह, आसिफ शाह, नगरसेवक इरफान अन्सारी, नगरसेवक सरफराज अन्सारी, तौसीफ खाटीक, इकबाल, अकील अन्सारी, फिरोज शाह, एजाज सय्यद, अकिला सय्यद, परविन शेख, कदीर अन्सारी, रईस मंसूरी, सोहेल काझी, नगरसेवक सादिक शेख, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## शेवाळीत अंमली पदार्थ जप्त; एक ताब्यात

धुळे, दि.५- शेवाळी (ता. साक्री) शिवारात एचपी पेट्रोल पंप जवळ एम.डी (मेफेड्रॉन), डोडा (पॉपी स्ट्रॉ) अंमली पदार्थ अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगणाऱ्यावर साक्री पोलीसांनी कारवाई केली. दोन लाखांपेक्षा अधिक अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी मालमत्तेच्या चोरीचे गुन्हे, अंमली पदार्थ वाहतुक आणि तत्सम गुन्हयांना आळा घालण्यासाठी धुळे जिल्हयात गस्त करणेबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी निर्देश दिले आहेत.

साक्री पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक दीपक वळवी यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी शेवाळी (ता. साक्री) गाव शिवारात मंगळवारी रात्री उशिरा पेट्रोल पंप जवळील हॉटेल सतलोज येथे पोलिसांनी पाहणी केली. (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,34,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,46,500 रु.+3% GST
चांदी- 2,30,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



आपला महाराष्ट्र

# अचंबित करणारी तरूणाईची प्रगल्भता

सर्वसाधारणपणे तरुणाई बेफिकीर, बेजबाबदार, चंगळवादाच्या आहारी गेलेली, आणि करिअर च्या मागे लागलेली असल्याचे समज गेल्या काही वर्षांपासून समाज जीवनात पसरलेले आहेत. काही बाबतीत ते खरेही आहे. पण संपूर्ण तरुणाई याच पद्धतीचे जीवन जगते असे जंतर-मंतर वरील आंदोलनानंतर म्हणता येणार नाही. ही पिढी अतिशय प्रगल्भ आणि वैचारिक दृष्ट्या समृद्ध आहे. अभ्यासू आहे. नव्या तंत्राचा वापर सकारात्मक रित्या विधायक उपक्रमांसाठी आणि आपल्या अधिकारांसाठी करण्याचे तंत्र त्यांनी आत्मसात केलेले आहे. म्हणूनच तरुणाईच्या जिव्हाळ्याच्या शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी हातात घेतलेल्या नीट परीक्षा पद्धती बद्दल आणि पेपर फुटी प्रकरणात आंदोलनाचे जगभर कौतुक झाले. त्यामुळे या पिढीविषयी आता लोक सकारात्मक दृष्ट्या बघू लागलेले आहेत. या आंदोलनाचे पडसाद इतर राज्यात देखील उमटले. झारखंड मध्ये लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या आणि इतर नोकर भरती परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटी विरोधात अनेक दिवसांपासून तरुणांची निदर्शने सुरू आहेत. या प्रकरणाची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या समितीकडून व्हावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी केलेली आहे. त्यासाठी विद्यार्थी शेकडोंच्या संख्येने रस्त्यावर उतरले आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेशात देखील अशा प्रकारे विद्यार्थ्यांची आंदोलने बघायला मिळाली. तशीच ती मुंबई पुण्यातही मिळाली. धुळ्या सारख्या शहरांमध्ये काही संघटनांनी यासाठी निदर्शने केली होती.

या सर्वांचा परिणाम म्हणून नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत शासक पक्षाच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण होईल असे निकाल आले आहेत. खुद्द राष्ट्रीय अध्यक्षांच्या मतदार संघात त्यांचा पक्ष हरला आहे. इतरत्र पक्षाचे मतदान घटले आहे. हा सगळा या आंदोलनाचाच परिणाम झालेला असल्याचे लोकांचे मत आहे. विविध क्षेत्रातील विचारवंतांचे देखील असेच मत आहे. तरुणांनी पोलिसांनी केलेल्या अत्याचाराचा हसत स्वीकार केला. पाण्याच्या फवारणीचा आनंद लुटला. लाठीमारानंतर पोलिसांनाच त्यांनी फुले भेट दिली. अशा तऱ्हेने आंदोलनात वेगळ्या अस्त्रांचा वापर गांधीजींच्या आंदोलनांचा धांडोळा घेत तरुणाईने खुबीने केला. मुख्य न्यायाधीशांनी झुरळ या शब्दाचा वापर केल्याने गंमत म्हणून काक्रोच जनता पार्टीची स्थापना आणि पेपर फुटीचे प्रकरण हाती घेऊन मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर-मंतरवर देशभरातील तरुणांनी केलेला पुकारा या बाबी दुर्लक्षित करता येण्यासारख्या नाहीत. सुरुवातीला कॉक्रोचचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या विषयी आणि त्यांच्या संपर्क विषयी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. आजही त्या प्रश्नांची व्याप्ती कायम आहे. परंतु ज्या पद्धतीने या तरुणांनी हे आंदोलन हाताळले. त्याविषयी भाष्य केले. वाटाघाटी केल्या. पत्रकार परिषदा घेतल्या, पत्रकारांच्या प्रश्नांना अचूक उत्तरे दिली. यावरून त्यांच्यातील वैचारिक प्रगल्भतेची सहज कल्पना येते. या आंदोलनाची परिणती मंत्र्यांच्या राजीनाम्यात झाली आणि काही मागण्या त्यांनी पदरात पाडून घेतल्या. तेवढ्यावर ही तरुणाई थांबेल असे दिसत नाही. छत्रपती संभाजी नगरात काक्रोच जनता पार्टीच्या रिंगणात असलेल्या निवडक तरुण-तरुणी दोन दिवसाच्या चर्चे साठी उतरले आहेत. हिंदी भाषिक असलेले या तरुण-तरुणींनी संभाजीनगर च्या पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना लिलया उत्तरे दिली.

त्यांनी जी मांडणी केली ती अचंबित करणारी आहे. राजकीय क्षेत्रातील वैचारिक दृष्ट्या परिपक्व अश्या नेत्यांनाही लाजवेल या पद्धतीने सहजपणे हे तरुण पत्रकारांशी बोलत होते. पत्रकारांनी त्यांना विचारले की, तुम्ही राजकीय पक्ष म्हणून पुढची रणनीती आखणार आहात काय यावर त्यांनी सांगितले की, देशात सातशे साडेसातशे राजकीय पक्ष आहेत. त्यामुळे पुन्हा आणखी एक पक्ष स्थापन करण्याची गरज नाही. आमची भूमिका दबाव तंत्राचा वापर करण्यासाठी गट म्हणून काम करण्याची आहे. अशा प्रकारचा दबाव गट आजपर्यंत देशात तयार झालेला नाही. आम्ही मात्र राजकीय फायद्यासाठी या दबाव गटाचा वापर करू इच्छित नसून देशासमोर आणि तरुणाई समोर जे बेरोजगारीचे प्रश्न आहेत, शैक्षणिक प्रश्न आहेत, महागाईचे आणि जीवनशैलीचे प्रश्न आहेत त्यावर लक्ष केंद्रित करणार आहोत. शिवाय २० जुलै रोजी जंतर मंतरवर पोलिसांनी केलेल्या अनन्वित छळाबद्दल आम्ही जाब विचारणार आहोत. तो छळ आम्ही विसरू शकत नाही. अशा पद्धतीची मांडणी या तरुण-तरुणी यांनी केली. त्यामुळे पुढील काळात काहीतरी सकारात्मक होईल असे दिसते. त्यांच्या मांडणीवरून आणि वैचारिक प्रगल्भतेतून आज तरी ही शक्यता दिसते. पुढचे माहित नाही. दोन दिवसांच्या चर्चे नंतर कुठले निष्कर्ष निघतात आणि कुठल्या निष्कर्षापर्यंत हे लोक पोहोचतात ते यथावकाश समजेलच तोपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल.

१९७० च्या दशकात लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांती चा नारा देऊन विद्यार्थ्यांचे संघटन निर्माण केले होते. त्या आंदोलनाची आठवण जंतर-मंतरवर झालेल्या तरुणांच्या आंदोलनाने करून दिली. जयप्रकाश नारायण यांच्या मते संपूर्ण क्रांती म्हणजे केवळ राजकीय सत्ता बदलणे नव्हे, तर समाज जीवनातील सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांत मूलभूत परिवर्तन घडवून आणणे होय. ५ जून १९७० रोजी पाटणा येथील गांधी मैदानावरील भाषणात त्यांनी याबाबतची स्पष्टता केली होती. ही क्रांती केवळ विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी नसून भारतीय लोकशाही मजबूत करणे, जनतेचे खरे राज्य प्रस्थापित करणे, अन्याय व शोषण समाप्त करणे आणि नैतिक, सांस्कृतिक व शैक्षणिक परिवर्तन घडवणे असा तिचा व्यापक उद्देश आहे. याच पद्धतीने कॉक्रोच जनता पार्टीचे तरुण बोलत आहेत. त्यांच्यासमोर देखील अमुलाग्र क्रांतीची स्वप्ने आहेत.जेपींच्या विचारांवर मार्क्स, महात्मा गांधी आणि विनोबा भावे या तिघांचा प्रभाव होता. मात्र त्यांनी या विचारांचा स्वतंत्रपणे समन्वय करून समाजपरिवर्तनाची अहिंसक आणि व्यावहारिक दिशा मांडली. जंतर-मंतर वरील तरुणाईने या पद्धतीची मांडणी केलेली नसली तरी त्यांचा रोख त्याच दिशेने होता. ही बाब महत्त्वाची मानवी लागेल. जेपींनी हिंसक क्रांतीऐवजी अहिंसा, सत्य, नैतिकता, लोकशाही आणि सर्वोदय यांना महत्त्व दिले.संपूर्ण क्रांतीमध्ये व्यवस्था आणि व्यक्ती दोन्ही बदलल्या पाहिजेत. केवळ सरकार बदलून समाजातील समस्या सुटणार नाहीत. समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक रचनांमध्ये परिवर्तन झाले पाहिजे आणि त्याचबरोबर व्यक्तीच्या विचारसरणीत व आचरणातही परिवर्तन झाले पाहिजे.जेपींच्या मते लोकशाहीची खरी ताकद राजकीय पक्षांपेक्षा सामान्य जनतेमध्ये आहे. पक्षीय पूर्वग्रहांपासून मुक्त असलेली जनता, विशेषत: विद्यार्थी आणि युवक, संपूर्ण क्रांतीचे प्रमुख वाहक ठरू शकतात. मात्र ही क्रांती एका वर्षात किंवा अल्प काळात पूर्ण होणारी नाही; ती दीर्घकालीन प्रक्रिया आहे आणि तिच्यासाठी संयम, नैतिक शक्ती व सातत्य आवश्यक आहे.असे नि: संदिग्ध प्रतिपादन त्यांनी केले होते. राजकीय पक्षाची निर्मिती न करता मूलभूत मुद्द्यांवर दीर्घकाळ लढा देणारा दबाव गट निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे काक्रोचचे तरुण सांगतात त्यामुळे त्यांची उद्दिष्टे लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या उद्दिष्टांप्रत पोहोचतात असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. छत्रपती संभाजी नगरात मांडलेली त्यांची भूमिका त्याकडेच अंगुलीनिर्देश करते.

सामाजिक क्रांती ,सामाजिक विषमता, शोषण व अन्याय दूर करणे.आर्थिक विषमता कमी करून न्याय्य आर्थिक व्यवस्था निर्माण करणे.लोकशाही अधिक लोकाभिमुख व प्रभावी करणे.लोकांच्या विचारांमध्ये मूलभूत परिवर्तन घडवणे.शिक्षणाला जीवनोपयोगी, श्रमाधारित आणि स्वावलंबन निर्माण करणारे बनवणे.समाजातील मूल्ये, आचार-विचार आणि सांस्कृतिक जीवनात परिवर्तन. व्यक्तीच्या नैतिक व आध्यात्मिक विकासाला महत्त्व देणे असे संपूर्ण क्रांतीचे काही मुद्दे आहेत. जेपी शिक्षणव्यवस्थेवर विशेष टीका करतात. त्यांच्या मते ब्रिटिश काळापासून चालत आलेली शिक्षणपद्धती मोठ्या प्रमाणावर पदव्या देणारी पण जीवनोपयोगी कौशल्ये न देणारी झाली आहे. लाखो युवक पदवी घेत असले तरी त्यांना रोजगार किंवा स्वावलंबन मिळत नाही.म्हणून शिक्षणअसे असावे की तेजीवनाशी जोडलेले असेल,श्रमाला प्रतिष्ठा देईल,युवकांना स्वावलंबी बनवेल,

ग्रामीण व गरीब समाजाच्या गरजा लक्षात घेईल,

नैतिक आणि सामाजिक जाणीव निर्माण करेल,

व्यक्तीला स्वत:च्या समस्या समजून त्यावर विचार करण्यास सक्षम करेल.गांधीजींच्या मूलभूत शिक्षणाच्या संकल्पनेशी हा विचार जवळचा आहे. जेपींच्या मते शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ पदवी मिळवणे नसून सक्षम, स्वावलंबी, विचारशील आणि जबाबदार नागरिक घडवणे हे असावे असा जो विचार संपूर्ण क्रांतीचा होता. त्यावर हुकूम काक्रोचच्या कार्यकर्त्यांनी दोन दिवसांच्या बैठकीत मंथन करावे आणि त्या दिशेने देशाला नेण्याचा कार्यक्रम आखावा अशी अपेक्षा आहे. या तरुणांनी ज्या मुद्द्यांची मांडणी केलेली आहे ते मुद्दे संपूर्ण क्रांतीच्या प्रारूपात दिसतात. म्हणूनच या क्रांतीच्या जवळ जाणारे तरुणांचे आंदोलन ठरावे अशी अपेक्षा करायला हरकत नसावी. जर राजकीय पक्ष विरहित लोकाभिमुख आणि लोकांचे प्रश्न घेऊन लढणारा गट तयार होत असेल तर यासारखी दुसरी चांगली गोष्ट असू शकत नाही. परंतु त्या संदर्भातील आतापर्यंतचे अनुभव चांगले नाहीत. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून आप पार्टीचा जन्म झाला. ते सत्तेत गेले आणि पुढे काय झालं ते आपण सर्व जाणतो.

शेतकरी संघटना अशाच पद्धतीने उभी राहिली होती. त्या संघटनेची उद्दिष्टे शेतमालाला रास्त भाव किंवा उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला तर सगळे प्रश्न सुटतील अशी होती. परंतु त्यातूनही एक राजकीय पक्ष उदयाला आला. काही लोक निवडून आले आणि विद्यमान व्यवस्थेच्या कच्छपी लागले ही वस्तुस्थिती आहे. तसे काक्रोचचे होणार असेल तर त्यांच्याविषयीच्या देशातील जनतेच्या पेक्षा फोल ठरतील. त्यांनी पत्रकारांसमोरची भूमिका मांडली त्यावर ते बांधील राहणार असतील तर त्यांचा दबाव गट नैतिकदृष्ट्या अतिशय उंचीचा असेल यात वाद असण्याचे कारण नाही.अभिजित दिपके याने परवा एक निवेदन केलेले आहे. जगाला प्रेरणा देणाऱ्या महात्मा गांधीजींचा वारसा भारताला लाभला असताना देशातील विद्यार्थी निदर्शकांना बांगलादेश किंवा नेपाळकडे बघण्याची गरज नाही असे मत त्याने निवेदन करताना व्यक्त केलेले आहे. बांगलादेश आणि नेपाळ मध्ये जेन झीने उठाव केला आणि सत्तांतर झाले. बांगलादेशच्या लेखिका तसलीमा नसरीन यांनी या दोन्ही देशातील घडामोडींची तुलना जंतर-मंतरवरील आंदोलनाशी केलेली होती. ही तुलना अभिजीत दिपकने याने अमान्य केली. आम्ही दिल्लीतील आंदोलनात दाखवून दिले आहे की आम्ही राज्यघटनेचे पालन करीत आहोत आणि आमचे आंदोलन शांततामय मार्गाने चालू होते. तो गांधीजींचा वारसा आम्ही समोर ठेवला. एवढा मोठा वारसा आपल्या देशाला लाभलेला असताना आपण नेपाळ किंवा बांगलादेश मधील उठावाकडे बघण्याची गरज नाही. असे जे दिपके याचे प्रतिपादन आहे ते सकारात्मक असून आशादायक वाटते.




## वणी-अंबोडे येथे पुरग्रस्तांना सेवाभारतीतर्फे मदतीचा हात

धुळे, दि.५- सेवाभारती धुळे जिल्हा आपत्ती विमोचन अभियाना अंतर्गत धुळे तालुक्यातील वणी-अंबोडे येथे शुक्रवार दि. ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता वणी अंबोडे येथे कन्हेर नाल्यात खुप मोठा पुर आला. पुरग्रस्त कुटूंबीयांना सेवाभारतीच्या वतीने जीवनावश्यक साहित्याचे वाटप करून मदतीचा हात दिला आहे.

या अचानक आलेल्या पावसामुळे व आलेल्या पुराने काठावर रहाणाऱ्या सर्व घरात पाणी गेले. सर्व घरात चिखल झाला होता. जीव वाचवण्यासाठी लोकं पळाले पण गृहोपयोगी साहित्य शालेय वस्तु वाहुन गेल्या. काही घरे वाहुन गेले. कपडे वह्या-पुस्तके ओली झाली. त्यामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे .पुरामुळे बाधित घरे संख्या ३०० च्या जवळपास आहे. पुर प्रभावित कुटुंबे ५०० संख्या च्या जवळपास आहे. या सगळ्या गोष्टी बघता सेवा भारती धुळेने तत्काळ मदतीचा हात समाजाला आवाहन करत साड्या, कपडे जमा करून वाटप केले व साधारण ६ दिवस पुरेल एवढे रोज लागणारे शिधा व जीवनावश्यक वस्तूंचे १५० किट वाटप सेवा भारती धुळेने केले. के.म.दुगल संस्थेने किट १६ दिले. त्याचबरोबर विशाल केले यांनी पाणी,व जेवणाची ५०० जणांची व्यवस्था केली आहे. त्याचबरोबर गवळी वाडा धुळे येथे सेवा भारती धुळे यांनी जणांची १०० जेवणाची व्यवस्था केली आहे. भारत विकास परिषदेने शंभर ब्लँकेट दिले.

सेवा भारती टिमने त्याच दिवशी गावाला भेट देऊन जीवन ड्रॉप लोकांना वाटप केले.काही जणांनी वस्तुरुप मदत केली. या आंबोडे गावाला सेवा भारती टिम भेट देऊन त्यांच्या गरजा पुर्ण करायचा प्रयत्न करते आहे.फि.वि.प्र.शा.प्रांत प्रमुख अनिल वाणी, विभाग प्रमुख हेमंत कापडी तसेच डॉ.प्रफुल्ल जाधव जिल्हा अध्यक्ष, घनश्याम जोशी उपाध्यक्ष, संध्या कुलकर्णी सचिव अजय जोशी सहसचिव, माधुरी शुक्ल कोषाध्यक्ष भुषण जोशी, लहु पाटील, सुनिल देशमुख, धगधगे यांनी सगळ्यांपर्यंत वेळेत मदत पोहोचवली.

## बडगुजर समाजातर्फे गुणवंतांचा सत्कार

धुळे, दि.५- बडगुजर समाज व्यावसायिक प्रतिष्ठाणच्या वतीने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या धुळे शहर, बाळपूर व फागणे उपनगरातील बडगुजर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहित मुदतीत अर्ज मागविले जात आहेत.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी प्रतिष्ठानतर्फे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार पहिली ते चौथीसाठी किमान ९० % व त्यावरील गुण किंवा ए अथवा ए-प्लस श्रेणी. पाचवी ते आठवीसाठी किमान ८५% व त्यावरील गुण किंवा ए- अथवा ए-प्लस श्रेणी. नववी ते दहावीसाठी किमान ८०% व त्यावरील गुण.आवश्यक आहे.तसेच विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही या सोहळ्यात विशेष सन्मान केला जाणार आहे. इच्छुक पालक व सामाजिक कार्यकर्त्यांनी पात्र विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रतीवर स्पष्ट अक्षरात पालकांचे नाव, पत्ता आणि मोबाईल क्रमांक लिहून तो दिलेल्या कोणत्याही सोयीच्या ठिकाणी १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत रचना हॉल व नक्षत्र रिसॉर्ट, पारोळा रोड, धुळे. न्यू अनिल बॅग कॉर्नर, आग्रा रोड, धुळे. बडगुजर अँड सन्स सायकल डीलर, आग्रा रोड, धुळे. द मफिंगर्ल, जे. बी. बडगुजर कॉलनी, देवपूर, धुळे. अंकुश गोकुळशेठ बडगुजर, बाळपूर. अमित चंद्रकांतशेठ बडगुजर, फागणे. येथे जमा करावा. असे आवाहन बडगुजर समाज व्यावसायिक प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

## सी.गो.पाटील महा.त व्याख्यानाचे आयोजन

साक्री, दि.५- अखिल भारतीय साहित्य परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत धुळे जिल्हा साहित्य भारती आणि विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,साक्री जि धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय साहित्यातील महर्षी व्यासांचे योगदान या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात संत तथा धार्मिक साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. प्रभाकर जोशी हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. के. बी. पाटील व प्राचार्य डॉ. संजीव गिरासे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे व प्राचार्य डॉ.अनंत पाटील यांनी केले आहे.

महर्षी व्यास हे भारतीय साहित्यपरंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असून, त्यांच्या साहित्यिक योगदानाचा आणि भारतीय संस्कृतीवरील प्रभावाचा या व्याख्यानातून सखोल परिचय करून देण्यात येणार आहे. साहित्यप्रेमी, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी तसेच सर्व रसिक नागरिकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**प्रकाश में आज चमेली की शादी**




शशी कपूर, शबाना, आजमी, डेनी, अरुणा इराणी, मदनपुरी असरानी

## पटेल स्वायत्त अभि.महाविद्या.तील विद्यार्थ्यांची टीसीएस मध्ये निवड

**शिरपूर, दि.५- आंतरराष्ट्रीय स्तरावर संगणक व सॉफ्टवेअर क्षेत्रात कार्यरत असलेल्या भारतातील अग्रगण्य अश्या टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस (टीसीएस) तर्फे झालेल्या कॅम्पस मुलाखतीत येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २४ विद्यार्थ्यांची सिस्टिम इंजीनीअर या पदावर निवड झाली.**

यापैकी टी.सी.एस. डिजीटल या निवड माध्यमाद्वारे निवड झालेल्या ९ विद्यार्थ्यांची वार्षिक रु.७ लाख, टी. सी.एस. निन्जा निवड माध्यमाद्वारे निवड झालेल्या १४ विद्यार्थ्यांची वार्षिक रु. ३.४६ लाख तर टी. सी.एस. प्राईम माध्यमातून निवड झालेल्या एका विद्यार्थिनीची वार्षिक रु.९ लाख या वेतनश्रेणीवर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली आहे.

जगप्रसिध्द टाटा उद्योग समूहाचा भाग असलेल्या टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस (टीसीएस) ही जागतिक बाजारात सॉफ्टवेअर निर्यातीत सर्वात मोठी भारतीय कंपनी आहे. टी.सी.एस. चे जगभरातील देशात कार्यालये असुन माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील लाख हून अधिक तज्ञ सल्लागार कार्यरत आहेत. प्रत्येक आर्थिक वर्षात टी.सी.एस. चा व्यवसाय आणि कार्यक्षेत्र याचा विस्तार उल्लेखनीयरीत्या वाढत आहे. अश्या अग्रगण्य कंपनीतर्फे प्लेसमेंटसाठी अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मानांकन केले जाते. उत्तर महाराष्ट्रात आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महविद्यालयास हे मानांकन फार आधीपासूनच प्राप्त आहे. तसेच, महाविद्यालयाने टीसीएस इंदूर आणि पुणे टीमसोबत जपानी भाषा प्रशिक्षण आणि इंटर्नशिप टाय-अप केला असून, याअंतर्गत विद्यार्थ्यांना दरवर्षी टीसीएसमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवण्यासाठी इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून दिली जाते. म्हणूनच आजमितीस महाविद्यालयातून पदवी प्राप्त केलेले हुन अधिक विद्यार्थी टी.सी.एस. कंपनीत विविध पदांवर कार्यरत आहेत. महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने कंपनीसाठी नुकतेच कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन केले होते. या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत असे विद्यार्थी या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. या प्रक्रियेतून यशस्वी रित्या पुढे जात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सिस्टिम इंजीनीअर पदावर थेट निवड झाली.

यात टी.सी.एस. प्राईम या प्रतिष्ठित श्रेणीच्या माध्यमातून वैभवी निंबा पाटील हिची निवड झाली असून तिला वार्षिक रु. ९ लाखांचे पॅकेज प्राप्त झाले आहे. टी. सी.एस. डिजीटल श्रेणीमध्ये निवड झालेल्या श्रुती ओंकार चौधरी, स्वानंद विनय नेरकर, वैभव सुधाकर पाटील, जयेश चंद्रकांत करंकल, शशिकांत प्रवीण जाधव, यश पांडुरंग पवार, श्रावणी जितेंद्र पाटील, सर्वेश दिनेश वाणी आणि नोमेश रवींद्र किरंगे या ९ विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांना वार्षिक रु. ७ लाखाचे पॅकेज मिळाले आहे. टी. सी.एस. निन्जा श्रेणीत तेजस राजेंद्र भवसार, अनिकेत प्रवीण पाटील, सुशील कारभारी पाटील, मानसी संतोष वाणी, आर्या मनीष तेहरे, दामिनी मोतीगिर गोसावी, दिव्या परमेश्वर माळी, दीक्षा माधव पाल, संस्कृती राजेश पवार, हर्षल नरेश शिरसाथ, वेदाश्री मनोज बोरगावकर, ललित युवराज माळी, कलेश उत्तम पाटील, आशिष विश्वास तिरमाले या १४ विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांना वार्षिक रु. ३.४६ लाख इतके पॅकेज प्राप्त झाले आहे. याप्रमाणे एकूण २४ विद्यार्थ्यांची सिस्टिम इंजीनीअर या पदासाठी टी. सी.एस. या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये स्तुत्य निवड झाली आहे.या यशस्वी प्लेसमेंट प्रक्रियेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे, संपूर्ण ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विशेष प्रयत्न केले.


विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले

## वेल्हाणे शिवारातील वीजपंप लंपास

धुळे, दि.५- वेल्हाणे (ता.धुळे) शिवारातील शेतातील विहीरीतुन चोरट्यांनी वीज पंप चोरून नेला याप्रकरणी धुळे तालुका पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल झाला.

दीपक प्रकाश पाटील रा. कुंडाणे, वेल्हाणे यांचे गाव शिवारात शेत आहे. चोरट्यांनी विहिरीतील २७ हजार रुपयांचा वीज पंप चोरून नेल्याची घटना २० जुलैस सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी दहा ते बारा दिवसांनंतर धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार ललित खळगे तपास करीत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक : २४२७



**आडवे शब्द :** १.राज्याची कायदा करणारी मुख्य संस्था ४.तीव्र तिरस्कार किंवा द्वेष ७.गुरांना खाऊ घालतात तो वनस्पतीजन्य पदार्थ ८.आजारपणात पिण्याचे औषधी पाणी ९. घाणेंद्रिय १०. साधू-संतांचे पाण्याचे भांडे १२.पीठ मळण्यासाठी वापरले जाणारे पसरट भांडे १३. घराणे, कुल किंवा पिढी १४.माणसाचे वर्तन किंवा चालचालणूक १७.चव नसलेले किंवा अळणी जेवण १९. पुष्कळ, अफाट किंवा अमर्याद २२.नाटकाची सुरवात किंवा प्रारंभ २३.फायदा किंवा नफा २४. मोठा किंवा गोलाकार आकार २५.वर्ण २६.वडिलांचे भाऊ २८.दुधापासून बनते ते पाचक पेय २९.अतिशय थंड हवा किंवा हुडहुडी ३१.साप्ताहिक सुट्टीचा वार ३४.नऊ ३६.पारंब्या असणारा एक मोठा आणि पूजनीय वृक्ष ३८.भाजी किंवा कोशिंबिरीत वापरले जाणारे लाल फळ ३९. एक पौराणिक देवयोनी किंवा पात्र ४१. मदनपत्नी ४३.मनुष्य प्राणी किंवा पुरुष ४५.थोर,श्रेष्ठ किंवा मोठा ४७.एक भित्रा आणि वेगवान धावणारा प्राणी ४९.एक हजार किलो ५१.आकाश ५३. संगीतातील सात सुरांची मालिका ५४.शाळेत खडूने लिहिण्याचा बोर्ड ५५. खूप किंवा जास्त **उभे शब्द :** १.सखोल आणि बुद्धिमान विचार करणारी व्यक्ती २.पाण्याचा प्रवाह किंवा तलवारीचे टोक ३.मुख्य कार्यक्रम किंवा बैठक होणारे मोठे सभागृह ४.पेच ५.म्हातारपणी चालताना आधार देणारी छडी ६.पैसे देऊन घेतलेली वस्तू ८.पाण्याचा कृत्रिम प्रवाह किंवा खाडी ९.उदास ११.पदार्थाचा लहानात लहान अविभाज्य कण १२.पुन्हा किंवा माघारी फिरणे १५.रानरेडा १६.माक-उलट लिहा १७.शतक-हिंदीत १८.कलावंत २०. लगेच २१. अभिनेता हेमंत बिर्जे यांचा एक सिनेमा २२.हल २५.रंगकाम करणारा २७.वातावरण ३०.राहण्याचे निश्चित ठिकाण किंवा तळ ३२.घर बांधताना रचतात ती ३३.भात शिजताना येणार आवाज ३५.उमर ३७.भीती-हिंदीत ४०.मुक्त संचार ४२. तीन दशक मिळून तयार होणारी संख्या ४५. तीळ ४६.जिन्नस,वस्तू मोजण्याचे एकक ४८.स्वच्छ ५०.फायदा ५२.ब्राम्हण

## शब्दकोडे क्रमांक : २४२६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | र | स | क | ट | | छा | पा | | वं | द | न |
| ज | ग | | ल | | स | व | ल | त | | या | |
| ग | | म | ह | ल | | णी | | र | या | | न |
| | सा | ठ | | गो | ठा | | वा | फ | | वा | डा |
| पा | व | | ज | री | | खो | टी | | पा | व | न |
| | ज | ह | र | | बों | ब | | घा | ट | | ड |
| मा | | स | ब | ब | | रे | खी | व | | वि | |
| न | ख | रा | | द | म | | र | | गु | ला | ब |
| व | ल | | अ | मा | न | त | | का | | य | म |
| ता | | त | ला | श | | र | थ | | ता | त | |
| | बे | | र्म | | पा | की | ट | मा | र | | मी |
| वा | ट | प | | क | री | ब | | स | पा | ट | |






# म.गांधी तत्वज्ञान केंद्रात रांगोळी स्पर्धेचे आयोजन

धुळे, दि.५- येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे व राष्ट्रीय सेवा योजना कबचौ उमवि यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे येथील तत्वज्ञान केंद्र परिसरात दि.१५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिन व विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त धुळे शहर व परिसरातील शालेय व महाव्दिद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

वैयक्तिक व समूह या दोन्ही गटात होणाऱ्या स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहे. वैयक्तिक गटात प्रथम २५१ रु. द्वितीय १५१ रु. तृतीय १०१ रुपये रोख व प्रमाणपत्र तसेच समूह गटासाठी प्रथम २५१, द्वितीय १५१ तृतीय तर तृतीय १०१ रुपये रोख व प्रमाणपत्र अशा स्वरूपाचे पारितोषिके दिली जाणार आहेत. स्पर्धेत सहभागी सर्वच स्पर्धक विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. रांगोळी स्पर्धे साठी राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण, संस्कार भारती व सामाजिक विषय दिलेले आहेत. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र परिसरात संपन्न होणाऱ्या रांगोळी स्पर्धेसाठी लागणारी रांगोळी स्पर्धकांनी स्वतः आणावयाची आहे

धुळे शहर व परिसरातील महाव्दिद्यालय व शाळेचे प्राचार्य व मुख्याध्यापक यांना विनंती की, आपल्या महाविद्यालयातील तसेच शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे. स्पर्धकांनी आपल्या महाविद्यालय/शाळेमार्फत आपली नावे दि. ११ ऑगस्ट २०२६ पर्यंत दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकावर कळवावीत किंवा प्रत्यक्ष स्पर्धा स्थळी येऊन नोंदवावीत. असे आवाहन रासेयो ,संचालक डॉ. प्रवीण महाले, केंद्राचे संचालक प्रो. डॉ. संजय ढोडरे यांनी केले आहे.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्राचे कार्याध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रोहिदास साळुंखे व गणेश गवळी परिश्रम घेत आहेत.

## वीज कंपनीचे साहित्य चोरी

धुळे, दि.५- विज वितरण कंपनीच्या आर्वी (ता.धुळे) कार्यालयातील युनिटमधुन चोरट्यांनी ११ केव्ही ड्राय सीटीचे चार नग चोरुन नेले. २० हजार रुपये किंमत आहे. सुरक्षारक्षक सुनिल भिवसन नवरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार गणेश काळे तपास करीत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व सबंधीतांना या जाहिर नोटिसीनी कळविण्यात येते की तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे जि.प. धुळे, धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे भोकर येथील बखळ प्लॉट म्हणजेच स.नं.१९९/१ मधील प्लॉट नं.३चे क्षेत्र १८७.५० चौ.मी. यासी चतुसीमा खालील मंजुर नकाश्या प्रमाणे

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही सौ.अनिता संजय बंब रा.सुभाष नगर जुने धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकी व ताबे व कब्जे उपभोगातील असून सदर मिळकत त्यानी कायमस्वरूपी खरेदी खतान विकण्याचा तोंडी सौंदा आमचे पक्षकारा सोबत केला असून आमचे पक्षकार लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत मा दुय्यम उपनिंबधक धुळे यांच्या कार्यालयात नोंदविणार आहे.

सबब, या जाहिर नोटिसीनी सर्व संबधिताना कळविण्यात येते की, वर नमूद वर्णनाच्या मिळकतीबाबत वर नमूद मिळकत मालकांशी कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, तारण, गहाणखत, सौदा, लिज, भाडेकरार, बक्षिसपत्र, जनरल अगर स्पेशल मुखत्यार इ. कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर हरकत व तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या खाली नमूद पत्यावर योग्य त्या कागदपत्रा सहीत लेखी स्वरूपात नोंदव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती अगर म्हणणे न आल्यास सदर मिळकती हया निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तसेच वर नमूद मुदती नंतर आलेल्या अगर परस्पर वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून घेतलेल्या हरकती आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटिस आमच्या पक्षकाराने सांगितल्यावरून आज रोजी आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०५/०८/२०२६.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.राहुल सुभाष शिकारे**
नोटरी भारत सरकार
१५, रामचंद्र नगर, पारोळा रोड, धुळे
**मो.नं.९४२२२१७८६७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे पुरमेपाडा ता.जि. धुळे येथील भुमापन क्रं. व उपविभाग ८७/२ चे ला ला क्षेत्र ०१ हे २९ आर, व पो.ख.० हे. १३ आर असे एकूण क्षेत्र ०१ हे ४२ आर चा आकार ३ रु.३० पैसे अश्या वर्णनाची जिरायत शेतजिमन मिळकत यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरूपी वापर रस्ता आहे व राहिल.

यासी चतु: सिमा गाव नकाशाप्रमाणे

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही रेखाबाई राजेंद्र देवरे रा.नाशिक यांच्या मालकीच्या व ताबेउपभोगातील असून यांच्या कडून सदर मिळकतीं या आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदरची मिळकज ही निर्बोज, निर्वेध व रेखाबाई राजेंद्र देवरे रा. नाशिक यांच्या मालकीच्या व ताबेउपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दि.०५/०८/२०२६.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवालाबिल्डींग जवळ, मिलपरीसर, धुळे
**मो.नं.९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँकांना हितसंबंधितांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** ७/१२ उताऱ्या प्रमाणे मौजे बोरीस ता.जि.धुळे येथील गट नं.३१४/३ चे एकूण क्षेत्र.ला.ला.१ हे. ४० आर, पो.ख.०. हे. ०३ आर, एकूण १ हे. ४३ आर, आकार रुपये. ४.१६ पैसे सदर गटात येणे जाणे करीता रस्ता हा जुन्या वहिवाटी प्रमाणे आहे व राहील.

-: यासी चर्तु:सिमा मंजुर गांव नकाशा प्रमाणे :-

येणेप्रमाणे वर्णन असलेली शेतजमीन ही श्री.अशोक मुरलीधर पाटील रा.मु.पो. बोरीस, ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून सदर शेतजमीन ही आमचे पक्षकार सतिष रमेश मोरे, रा.मु. पो.सवाई मुकटी, ता.शिंदखेडा जि.धुळे यांच्याशी खरेदी खताचा सौदा केला आहे.

तरी सर्वांना या जाहिर नोटीशी द्वारे कळविण्यात येते की, सदर शेतजमीनी संदर्भात कोणाचीही कुठलीही प्रकारे सौदा पावती, हक्क, हितसंबंध, देणे घेणे, माहिती हक्क, भाडेपट्टा व लिज, ताबा, गहाण, बोजा, कर्ज, टांच, व वारसा हक्क, खावटी, ज.मु., वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याच्या ८ दिवसाच्या आत योग्य त्या कागदपत्रांच्या प्रतिसहीत आमच्याकडे हरकती सादर कराव्यात. परस्पर हरकत जाहीर नोटीस वर्तमान पत्रात आल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही. व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर शेतजमीन ही निर्बोज म्हणून खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. सदर जाहीर नोटीस आमच्या पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन आमच्या मार्फत प्रसिध्द करण्यात आले आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे, दिनांक- ०३/०८/२०२६.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवालाबिल्डींग जवळ, मिलपरीसर, धुळे
**मो.नं.९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स.नं.१८/१/अ पैकी प्लॉट नं.५० चे एकूण क्षेत्र १७४.०० चौ.मी. उर्वरीत बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा

| यासी | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- | रस्ता, |
| पश्चिमेस- | लागू सर्व्हे नं.१८, |
| दक्षिणेस- | प्लॉट नं.४९, |
| उत्तरेस- | प्लॉट नं.५१. |

येणे प्रमाणे वर्णनाची आतील मिळकत रघुनाथ लोटन महाजन रा.धुळे-४२४००१ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यानी सदरहू मिळकत कायमस्वरूपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे व बयाण्याची रक्कम ही स्विकारली आहे. आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉटवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- धुळे,

दिनांक:- ०५/०८/२०२६.

**ॲड.चेतन महादु यादव**
पत्ता- सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरु सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१
**मो.नं.९६८९१२४६९२**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतपेढी, वित्तीय संस्था, संबंधितास, मिळकतीचे मुळ मालक, तसेच मिळकतीबाबत व त्यांचेकडेस या मिळकतीबाबत हक्क दाखविणाऱ्या सर्व वारसांस तसेच इतर कुठल्याही स्वरुपाचा व्यवहार करणार सर्व संबंधितांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार यांनी उताऱ्यावरील मालक श्री.रुपचंद सुका चौधरी रा.मु.पो. लामकानी ता.जि.धुळे यांचे सोबत मौजे लामकानी शिवारातील गट नं.५०१ त्याचे एकूण क्षेत्र हे २-१७ आर आकार रु.३-०५ पैसे पैकी उत्तरेकडील भाग त्याचे क्षेत्र हे-०-८० आर आकार रु.१-१० पैसे भोगवटादार वर्ग-१ ची शेतजमीन अशी मिळकत असून, त्याची चतृः सिमा खालील प्रमाणे आहे व राहील. व वापर वहिवाटी प्रमाणे आहे व राहील.

पुर्वेस- याच गटाचा उर्वरीत भाग, पश्चिमेस- गट नं.५०२,
दक्षिणेस- गट नं.५०१ चा पार्ट, उत्तरेस- याच गटाचा उर्वरीत भाग.

अश्या मिळकतीचा कायम खरेदी घेण्याचा सौदा केलेला असून, आमचे पक्षकारांनी लिहून देणार यांना काही रक्कम बयाणा म्हणून देखील दिलेली असून, सौदा करुन घेतलेली आहे, आमचे पक्षकार लवकरच व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर नोटीस ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आहे.

सबब सदर मिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी हितसंबंध, तसेच विक्री अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, मृत्युपत्र, करार, कौटूंबिक तजवीज, हिंदु अन डिव्हायडेड फॅमिली, प्रतिमाळ, जप्ती, आरक्षण किंवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी, अत्यंदान, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश, स्थगिती आदेश/हुकूमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण-घेवाण, बेचेन-पत्र, कर्ज फिटेपर्यंत मिळकत ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि/अथवा स्वारस्थ असलेले पतदार, आणि/अथवा लेंडर, समाविष्ठ असलेले किंवा नसलेल्या व्यक्तींची संस्था, किंवा व्यक्तींची असोसिएशन, वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी; स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मागणीच्या स्वरूपातील वर नमूद मिळकती/किंवा वर नमूद मिळकतीचा कोणताही भाग किंवा त्याच्या हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप; असल्यास कृपया लेखी स्वरूपात पुष्ट्यर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत खालील नमूद केलेल्या पत्यावर सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आक्षेप/हरकती नोंदवाव्यात. मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द केलेल्या तसेच कागदपत्राशिवाय आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून त्यांच्यावतीने आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात येत आहे. कळावे ही जाहीर नोटीस, धुळे, दि.०५/०८/२०२६.

**ॲड.संतोष दत्तात्रय ठाकूर**
पत्ता- शॉप नं.१ ते २, ठाकूर कॉम्प्लेक्स, जि.प.समोर, स्टेट बँक मुख्य शाखेजवळ, एल.आय.सी.ची बोळ, धुळे **मो.नं.९०९६०६७१८८**

## जाहीर नोटीस

श्री.संजय युवराज पाटील, रा.कापडणे, ता.जि.धुळे यांना तसेच तमाम जनतेस आम्ही १.आशाबाई जाधव थोरात, रा.हिमदयाल नगर, वराछा रोड, सुरत व नंदाणे, ता.जि.धुळे, २. कल्पनाबाई जगदिश ढिवरे, रा.खर्दे, ता.शिरपूर, जि.धुळे व नंदाणे, ता.जि.धुळे, ३.भिलाबाई अमृत इंदवे, रा.ऐचाळे, ता.साक्री, जि.धुळे व नंदाणे, ता.जि.धुळे यांचे तर्फे सदर जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे नंदाणे, ता.जि.धुळे. येथील गट नं.२२२ हा नवीन अविभाज्य शर्तीचा आमचे मालकी व कब्जे उपभोगातील असून धुपताबाई नारायण शिरसाठ हया आमच्या जन्मदात्या आई होत्या. आम्हाला भाऊ नसल्यामुळे आम्ही तिघे बहिणी हयाच धुपताबाई नारायण यांच्या एकमेव वारस होत्या व आहोत. आमच्या आईच्या औषध उपचारासाठी तसेच कौटुंबीक गरजा भागविण्यासाठी आम्ही गट नं.२२२ चा विक्री करण्यासाठी तुम्ही तसेच संदिप किशोर बारी यांनी रक्कम रू.१६,३०,०००/- वर सौदा केलेला होता. तसेच तुम्ही संजय युवराज पाटील यांनी गट नं.२२२ नवीन शर्तीचा असल्याने कलेक्टर यांची विक्रीसाठी परवानगी आणावयाची होती व त्यासाठी दि.०७/११/२०१२ रोजी तुम्ही संजय युवराज व संदिप किशोर बारी यांनी आमच्याकडून बेकायदा सौदा पावती लिहुन घेतली व २,७५,०००/- रूपये बयाणा म्हणून देवून आम्हाला लिहता, वाचता येत नसल्याचा गैरफायदा घेवून सौदा पावतीत फक्त ६,३०,०००/- रूपये लिहिल्याचे आम्हाला थोडया दिवसांपूर्वी कळालेले असून तुम्ही आमची फसवणूक केलेली होती व आहे. त्यामुळे दि.०७/११/२०१२ चा सौदा रद्द केले बाबतचे तुम्हास तसेच संदिप किशोर बारी यांना कळविण्यात आलेले होते व आहे.

तसेच तुम्ही संजय युवराज पाटील यांनी बेकायदा आम्हाला लिहता, वाचता येत नसल्याचा गैरफायदा घेवून फसवून कधीही रद्द न करता येणारे जनरल मुखत्यार पत्र सुध्दा लिहुन नोंदून घेतल्याचे थोडया दिवसांपुर्वीच आम्हाला कळालेले होते व आहे, व त्यामुळे सदर मुखत्यार पत्र दस्त नं.८०८९/१२ दि.०८/११/२०१२ रोजीचे त्याची नक्कल आम्हाला नुकतीच मिळाल्यावर कळाले की, तुम्ही निव्वळ आमची शेतजमिन बेकायदा हडप करण्यासाठीच आमची फसवणुक होवून तुम्हाला बेकायदा गट नं.२२२ चा परस्पर फुकटात बळकावता येण्यासाठीच आमच्याशी रक्ताचे नातलग दाखवून बेकायदा मुखत्यार पत्र लिहुन नोंदुन घेवून सन २०१२ पासून ते २०२२ पर्यंत कोणतीही विक्रीची परवानगी न आणता तसेच बारी व तुम्ही कोणतीही रक्कम रू.१३,५५,०००/- न दिल्यामुळे आम्हाला आमची आई धुपताबाईचा औषधोपचार करता आला नाही त्यामुळे तिचा दुर्देवी अंत झाला, त्यास तुम्हीच जबाबदार होते व आहेत.

तुम्ही सन २०२२ पर्यंत जवळ जवळ १० वर्ष परवानगी आणली नाही व आमची आमच्या अडाणीपणामुळे हेऱ्याशमेंट केली, आमची फसवणूक केली व उलट खोटयानाटया नोटीसा दिल्यात. त्यामुळे आमचा तुमच्यावर विश्वास राहिलेला नसल्यामुळे तुम्ही आमची फसवणूक केलेली असल्यामुळे तुम्ही आमची हेऱ्याशमेंट करून आमचे कधीही न भरून येणारे नुकसान केलेले असल्यामुळे तुम्हाला मुखत्यार म्हणून ठेवावयाचे नसून मुखत्यार पत्राचे अधिकार कायमचे संपुष्टात आणलेले होते व आहेत. यापुढे तुम्हास आमचे मुखत्यार म्हणून कायम ठेवण्यास आमची संमती नाही.

सबब सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मुखत्यार पत्र दस्त नं.८०८९/१२ दि.०८/११/२०१२ रोजीचा रद्दबातल आहे. त्यासाठी सदर जाहीर नोटीस दिली असे. दिनांक- ०५/०८/२०२६.

**ॲड.सी.जे.सुर्यवंशी, धुळे**
**मो.नं.८४५९६४१८३७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि.धुळे येथील स.नं.१४/७+८ पैकी प्लॉट नं.१९ चे क्षेत्र १५२ चौ.मी. यांसी चर्तुः सिमा- पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : स.नं.७, दक्षिणेस : प्लॉट नं.२०, उत्तरेस : प्लॉट नं.१८. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.प्रशांत पांडूरंग माळी, रा.घर नं.७०८, गल्ली नं.१४, सुभाष नगर, जुने धुळे, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल ज्योती देवेंद्रसिंग गिरासे, रा.नवीन विठठल नगर, मु.चिखली, पोस्ट रूपीनगर, जि.पुणे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, आरक्षण, सॉल्वन्सी रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०५/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे हट्टी खुर्द, ता.साक्री, जि.धुळे येथील शेत गट नं.१८३/२ चे क्षेत्र ला ला.०३ हे. २५ आर, आकार रू.३.२५ पैसे यांसी चर्तु:सिमा मंजुर नकाशा प्रमाणे. येणे प्रमाणे वर्णनाची शेत जमीन १) इंदुबाई आनंदा सोनवणे २) लोटन आनंदा सोनवणे ३) निर्मला मगन ध्यानिश यांचे मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांनी नमूद शेत जमीन/मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर शेत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. सदर शेत मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०५/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल., ता.जि.धुळे येथील गट नं.३१ पै. ३२/१ ते ३ यापैकी प्लॉट नं.१० चे एकूण क्षेत्र २७९ चौ.मी. यांसी वि.सि.स.नं. १११ चे एकूण क्षेत्र २८४.६ चौ.मी., सत्ता प्रकार 'क', यापैकी अविभाज्य पश्चिमेकडील भागाचे सात बारा उतारा प्रमाणे क्षेत्र १११.६२ चौ.मी. व सि.स.उतारा प्रमाणे क्षेत्र १११.२० चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : याच प्लॉट नं.१० पैकी भाग, पश्चिमेस : प्लॉट नं.९, दक्षिणेस : प्लॉट नं.८, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत मनियार रेहाना बी युसुफ, रा.जामचा मळा, सुलतानिया चौक, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल रजवी जाकीर शाह, रा.७१९, शिवाजी नगर, वडजाई रोड, धुळे, याचांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जा पावती, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०४/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कावठी, ता.जि.धुळे येथील शेत गट नं.७०६ चे एकूण क्षेत्र ला.ला.६ हे. ४८ आर, पो.ख.० हे. ३० आर, एकूण क्षेत्र ६ हे. ७८ आर, आकार र.रु.१४.५५ पैसे, भोगवटादार वर्ग-२, यांसी चर्तु:सिमा मंजुर गांव नकाशा प्रमाणे. येणे प्रमाणे वर्णन केलेली शेत मिळकत १) नंदाबाई गोकुळ खैरनार २) पिंटू काशिनाथ पाटील ३) इंदुबाई काशिनाथ वाघ ४) विलास काशिनाथ पाटील यांचे मालकीची असून सदरहु मालकांपैकी १) नंदाबाई गोकुळ खैरनार २) पिंटू काशिनाथ पाटील ३) इंदुबाई काशिनाथ वाघ यांनी त्यांचे हिस्से राशीने मालकीची व ताबेउपभोगातील अविभाज्य मालकीचे क्षेत्र ला.ला.३ हे. २० आर, शेत जमीन/मिळकत कायम विक्रीचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

सदरहु मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना सक्षम प्राधिकार्याच्या पूर्व परवानगीने पूर्ण करावयाचा आहे. तसेच सदरहु शेत मिळकतीच्या सात बारा उताऱ्यावरील इतर हक्कात बँक ऑफ महाराष्ट्र शाखा दत्त मंदिर चौक, धुळे चे कर्ज बोजे नमुद/प्रलबिंत आहेत. तरी या व्यतिरिक्त सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, मुखत्यारपत्र, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, हितसंबध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०३/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि. धुळे येथील, म.न.पा. वाढीव हददीतील भुमापान क्रमांक व उपविभाग : १६/६/म.अ. प्र. प्लॉट नं.४२/मोप्र प्लॉट नं.४४/म.अ.प. प्लॉट नं.४३/मो.प्र. प्लॉट नं.४५ चे एकूण क्षेत्र ९७५.५० चौ.मी. यात बांधीव शिवसंकल्प नावाने ५ रोंहाऊस बांधलेले असून यापैकी तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला ते दक्षिणेकडून भाग रो हाऊस क्रं. सी चे क्षेत्र १२०.८१ चौ.मी. यात आर.सी.सी. दुमजली बांधीव घर व उर्वरित बखळ जागे सह मिळकत, यांसी चर्तु:सिमा पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : याच प्लॉट पैकी बखळ जागा, दक्षिणेस : याच प्लॉट मधील रो हाऊस नं. बी, उत्तरेस : याच प्लॉट मधील रो हाऊस नं. डी. येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत श्री.रावसाहेब बारकु चौधरी, रा.वरखेडे, ता.जि.धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, हितसंबंध, देणे घेणे, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्व क सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०५/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतीयांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी धुळे मनपा हद्दीतील मौजे गुलाब हाजी नगर देवपुर येथील ।। जुना मालमत्ता क्र.३३/३, प्लॉट नं.४४ यासी सि.स.नं.९३५७, एकूण क्षेत्र ५४.०० चौ.मी. यांसी चतु:सिमा लेआऊट प्लॅन प्रमाणे ही मिळकत चिराग गनी सय्यद यांचे मालकीचे व ताबे उपभोगातील आहे.

येणेप्रमाणे मिळकतीचे हल्ली कब्जेदार व मालक चिराग गनी सय्यद, रा.धुळे ता.जि.धुळे यांनी आमचे पक्षकार वसिम शेख रफियुद्दीन शेख, रा. घर नं.१३४, नुर मस्जिद जवळ, विटाभट्टी, देवपुर, धुळे ता.जि.धुळे यांचे सोबत कायम विक्रीचा सौदा केला असून बयाणा पोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सदर मिळकत बाबत कोणाचे काही हक्क, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, तसेच इतर काही हक्क, हितसंबंध, अगर तक्रार असल्यास, मुळ कागदपत्रा सोबत आपली लेखी हरकत ७ (सात) दिवसाच्या आत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून खालील दिलेल्या पत्यावर कळवावे. नियोजीत कालावधीमध्ये कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरुन आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर हरकत आमच्या पक्षकारावर व प्रस्तुत मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमान पत्रात हरकत घेतल्यास ती देखील आमच्या पक्षकारावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व दस्तऐवजावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. कळावे.

येणेप्रमाणे जाहिर टायटल व्हेरीफिकेशन नोटीस असे.

ठिकाण- धुळे, दि.०५/०८/२०२६.

**ॲड.रविंद्र एस.सोनवणे**
निवास/कार्यालय- प्लॉट नं.२९, एकता नगर, बिलाडी रोड, देवपूर, धुळे
**मो.नं.९८५०२५८४३१**

## सौदा करार रद्द बाबत जाहीर नोटीस

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री.योगेश गोकुळचंद सिंगवी, रा.फागणे, ता.जि.धुळे यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचा सौदा केला होता. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव व्यवहार पूर्ण होऊ शकणार नसल्याने उभयतात झालेला सौदा आपसात संमतीने रद्द केला आहे. सदरहू व्यवहारा बाबत दैनिक ''आपला महाराष्ट्र'' या वर्तमान पत्रात दिनांक ०१/०८/२०२६ रोजी प्रसिध्द झाली होती. तरी यापुढे उपरोक्त परिष्टात नमूद मिळकतीवर दि.०१/०८/२०२६ रोजीच्या जाहीर नोटीसीस अनुषंगुन कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार राहणार नाही. तसेच सदर व्यवहाराबाबत दावे-फाटे, केस, अर्ज, मनाई हुकूमामाचा दावे एकमेंकाविरूध्द करावयाचे नाहीत, केल्यास उभयतांनी केलेल्या या जाहीर नोटीसीने रदद समजण्यात येईल.

परिशिष्ट :- मौजे अजंग, ता.जि.धुळे येथील शेत जमीन गट नं.६६/ब चे क्षेत्र ला.ला. ० हे. ४० आर आकार रू.१.८० पैसे, भोगवटादार वर्ग-१, यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : गट नं.५९, पश्चिमेस : गट नं.६६/अ, दक्षिणेस : गट नं.६०, उत्तरेस : गट नं.६७.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०५/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## CHANGE NAME

MY PREVIOUS NAME WAS **SHAIKH NASIR** AND MY NEW NAME IS **NASIRODDIN AMIRODDIN SHAIKH**
ADD- 296 AGRA ROAD NEAR OLD SP OFFICE LALA SARDAR NAGAR DEOPUR, DHULE MH 424002

## CHANGE NAME

MY PREVIOUS NAME WAS **HAJRA BANO** AND MY NEW NAME IS **HAJRA BANO RAFEEQUE AHMAD ANSARI**
ADD- MOULVIGANJ NEAR PULL, DHULE 424001 MAHARASHTRA

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बॅका, सर्व वित्तीय पतसंस्था, यासी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन. तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे, मौजे देवपूर ता.जि.धुळे येथील स.नं.५३ पैकी प्लॉट नं.२५+२६/१अ चे एकूण क्षेत्र १००.१२ चौ.मी. सायी विस्तारीत सि.स.नं.५२५४ चे एकूण क्षेत्र ९०४.१० चौ.मी. यापैकी सब प्लॉट नं.२५+२६/१अ चे एकूण क्षेत्र १००.१२ चौ.मी. यात सुमारे १८ वर्ष जुने दुमजली आर सी सी बांधीव घराचे तळमजला व पहिल्या मजल्याचे असे एकूण बांधीव घराचे क्षेत्र ८३.७८ स्के.मी. व उर्वरीत बखळ ही मिळकत यासी चतु:सिमा

पुर्वेस- वापर व रस्ता, पश्चिमेस- लॉट नं.२७,
दक्षिणेस- सब प्लॉट नं.२५+२६/३, उत्तरेस- प्लॉट नं.१९,

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत श्री.मुकुंद संतोष अहिरे, रा.धुळे, ता.जि. धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील आहे व आमचे अशिल श्री.मयुर उदय महाजन रा.धुळे ता.जि.धुळे यांचेशी सौदाकरार केलेला आहे तसेच बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. व लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त प्लॉट बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा, इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करून शहानिशा करून दयावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दिस दिली असे. धुळे, दि.०५/०८/२०२६.

**ॲड.समाधान जानकीराम पाटील**
ऑफिस- शॉप नं.१९, १ला मजला अण्णाभाऊ साठे संकुल, फाशीपुल, धुळे, ता.जि.धुळे. **मो.नं.८८८८३१९२७३**

## जाहीर नोटीस

### धुळे येथील मे.मोटर अपघात दावे न्यायाधिकरण सो., यांच्या न्यायालयात

एम.ए.सी.पी.नं.११६/२०२६, Exh.19,

निलेश रूपचंद भिल, वगैरे ....अर्जदार
विरूध्द
संजय खुमानसिंग गिरासे ....जाबदेणार

प्रती,
संजय खुमानसिंग गिरासे, उ.व.२९ वर्ष, धंदा- चालक,
रा.मरीमाता मंदिराजवळ, आदिवासी वस्ती,
खलाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे-४२५४०७

ज्याअर्थी, दि.१५/१०/२०२५ रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास आशाबाई रूपचंद भिल उ.व.४९, धंदा- मजुरी रा.खलाणे ता.शिंदखेडा जि.धुळे ही मोटर अपघातात गंभीर दुखापती होवून मयत झाली आहे. म्हणून आम्ही अर्जदार तुम्ही जाबदेणार क्र.१ विरूध्द धुळे येथील मोटर अपघात दावे न्यायाधिकरणात मोटर अपघात कायदा १९८८ चे कलम १६६ प्रमाणे नुकसान भरपाई रक्कम रू.२०,००,०००/- मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. तुम्ही जाबदेणार क्र.१ डंपर क्र.**MH-08-AP-1282** चे चालक आहात.

त्याअर्थी तुम्ही जाबदेणार क्र.१ यांनी दि.०८/०९/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मे.मोटर अपघात दावे न्यायाधिकरण (**AD-HOC.D.J3DHULE**) यांचे कोर्टात स्वत:हजर वकीलामार्फत हजर आहे. अन्यथा सदर अर्जाबाबत तुमचे काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरून न्यायाधिकरण तुमचे विरूध्द एकतर्फा आदेश करतील.

सदर जाहीर नोटीस मे.न्यायालयाच्या सही शिक्यांनिशी दि.०५/०८/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

कामगिरी कारकून
(शिक्का)
अधिक्षक
मोटार अपघात न्यायाधिकरण
जिल्हा न्यायालय, धुळे

## जाहीर नोटीस

### धुळे येथील मे.मोटर अपघात दावे न्यायाधिकरण सो., यांच्या न्यायालयात

एम.ए.सी.पी.नं.११७/२०२६, Exh.19,

लता शिवाजी भिल ....अर्जदार
विरूध्द
संजय खुमानसिंग गिरासे ....जाबदेणार

प्रती,
संजय खुमानसिंग गिरासे, उ.व.२९ वर्ष, धंदा- चालक,
रा.मरीमाता मंदिराजवळ, आदिवासी वस्ती,
खलाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे-४२५४०७

ज्याअर्थी, दि.१५/१०/२०२५ रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास लता शिवाजी भिल उ.व.४४, धंदा- मजुरी रा.खलाणे ता.शिंदखेडा जि.धुळे ही मोटर अपघातात गंभीर दुखापती होवून मयत झाली आहे. म्हणून मी अर्जदार तुम्ही जाबदेणार क्र.१ विरूध्द धुळे येथील मोटर अपघात दावे न्यायाधिकरणात मोटर अपघात कायदा १९८८ चे कलम १६६ प्रमाणे नुकसान भरपाई रक्कम रू.१०,००,०००/- मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. तुम्ही जाबदेणार क्र.१ डंपर क्र.**MH-08-AP-1282** चे चालक आहात.

त्याअर्थी तुम्ही जाबदेणार क्र.१ यांनी दि.०८/०९/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मे.मोटर अपघात दावे न्यायाधिकरण (**AD-HOC.D.J. 3 DHULE**) यांचे कोर्टात स्वत:हजर वकीलामार्फत हजर आहे. अन्यथा सदर अर्जाबाबत तुमचे काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरून न्यायाधिकरण तुमचे विरूध्द एकतर्फा आदेश करतील.

सदर जाहीर नोटीस मे.न्यायालयाच्या सही शिक्यांनिशी दि.०५/०८/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

कामगिरी कारकून
(शिक्का)
अधिक्षक
मोटार अपघात न्यायाधिकरण
जिल्हा न्यायालय, धुळे

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

विभागीय कार्यालय, रा.प. धुळे
पालेशा कॉलेज जवळ, दक्षता एस.आर.पी.एफ. पेट्रोल पंपासमोर, धुळे
दुरध्वनी-०२५६२-२९९५३४ ई-मेल- dtostdhule@gmail.com

वाहतूक शाखा

### प्रथम मुदतवाढ निविदा सुचना क्र.०१/२०२६

विभाग नियंत्रक रा.प. धुळे हे खालील वाणिज्य आस्थापना ''लिव्ह अॅण्ड लायसन्स'' तत्वावर मासिक परवाना शुल्कावर चालविण्यास देण्यासाठी मोहरबंद निविदा मागवित आहेत. निविदेसाठी लागणारे कोरे छापील निविदा फॉर्म, नियम, अटी व शर्ती इ. तपलशीलासह विभाग नियंत्रक रा.प. धुळे यांच्या कार्यालयात शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी कार्यालयीन वेळेत ११.०० ते १५.०० या वेळेत निविदा फॉर्म रक्कमेचा भरणा करुन पावती सादर केल्यास निविदा फॉर्म मिळतील. निविदा फॉर्म किमंत रु.५००/- शासनाच्या नियमाप्रमाणे सिजीएसटी ९% व एसजीएसटी ९% असे एकूण रु.५९०/- तसेच उपहारगृह व स्नॅकबार या आस्थापनांचे निविदा फॉर्म किमंत रु.१०००/- शासनाच्या नियमाप्रमाणे सिजीएसटी ९% व एसजीएसटी ९% असे एकूण रु.११८०/- भरुन निविदा फॉर्म मिळतील. ''लिव्ह अॅण्ड लायसन्स'' या तत्वावर करण्यात येणार. साक्री, अक्कलकुवा व धडगाव उपहारगृह परवानाधारकाची निवड ०५ वर्षाकरीता व इतर आस्थापना परवानाधारकांकरीता ०९ वर्षाकरीता निवड करण्यात येईल. ५ व ९ वर्षाचा परवाना कालावधी संपल्यानंतर संबंधित वाणिज्य आस्थापनेचा ताबा संबाधीतांनी रा.प.महामंडळाकडे द्यावा लागेल व हे त्यांच्यावर बंधनकारक राहिल. त्या अनुषंगाने नव्याने निविदा मागविल्या जातील.

निविदाकारास अटी व शर्ती तसेच फॉर्ममध्ये नमूद केलेले सर्व दाखल्यांच्या प्रमाणित प्रति व बयाना रक्कम भरल्याची मुळ पावती जोडणे आवश्यक आहे. निविदा अर्ज भरणे/ सादर करणे दिनांक ०६/०८/२०२६ ते १४/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहिल. शेवटच्या दिवशी दिनांक १४/०८/२०२६ रोजी बयाणा भरण्याची व फॉर्म विक्रीची मुदत १३.०० वाजेपर्यंत व निविदा स्विकारण्याची वेळ १५.०० वाजेपर्यंत राहिल. त्याच दिवशी १५.३० वाजता निविदाकारासमक्ष निविदा पेटी उघडण्यात येऊन तांत्रिक निविदा तपासणी करण्यात येईल. काही प्रशासकीय अडचणीस्तव त्याच दिवशी निविदा उघडणे शक्य झाले नाही तर प्रशासनाच्या सोईनुसार उघडण्यात येतील व तशी कल्पना निविदाकारास दिली जाईल.

०१/२०२६ प्रथम मुदतवाढ निविदा प्रसारीत करावयाच्या वाणिज्य आस्थापनांचा तपशील.

| अ. क्र. | बस स्थानक | आस्थापना प्रकार | जागेचे प्रकार | जागेचा क्षेत्रफळ (चौ. फुट) | अपेक्षीत रक्कम | बयाणा रक्कम | मोकळी जागेची चर्तु:सिमा/ बांधीव गाळा, शॉप, स्टॉल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकुवा | जनरल स्टोअर्स | बांधीव | ९६.०८ | ३२८२ | ३९३८४ | (शॉप क्र.२) |
| २ | अक्कलकुवा | उपहारगृह | बांधीव | ४२३.०८ | १२१६४ | १४५९६८ | (कॅन्टीन) |
| ३ | अक्कलकुवा | झेरॉक्स | बांधीव | ८३.८२ | ३०१६ | ३६१९२ | (शॉप क्र.३) |
| ४ | अक्कलकुवा | स्व.म.व्दारे पॉपकॉर्न | बांधीव | ४७.४५ | २०२९ | २४३४८ | (स्टॉल क्र.१) |
| ५ | अक्कलकुवा | भेळ- भंडार | बांधीव | ४७.४५ | २०२९ | २४३४८ | (स्टॉल क्र.२) |
| ६ | अक्कलकुवा | केशकर्तनालय | बांधीव | ५३.८० | २१६६ | २५९९२ | (शॉप क्र.५) |
| ७ | धडगाव | उपहारगृह | बांधीव | ३२७.९६ | ७७२१ | ९२६५२ | (कॅन्टीन) |
| ८ | आर्वी | चहाकेंद्र | बांधीव | ८०.०० | १८२० | २१८४० | |
| ९ | तळोदा | मेडिकल | बांधीव | ३७३.३७ | ५९५४ | ७१४४८ | |
| १० | तळोदा | गिफ्ट शॉप | बांधीव | ४९.५० | १४६७ | १७६०४ | |
| ११ | दहिवद | चहाकेंद्र | बांधीव | ८०.०० | १०११ | १२१३२ | |

निविदा सादर करणारे निविदाकारांना निविदा फॉर्म सोबत व दि.०३/०७/२०२६ रोजी प्रसारीत झालेल्या निविदेतील अटी/शर्ती लागु राहातील.

निविदाकाराने निविदा नमुना ''अ'' तांत्रिक फॉर्म सोबत खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. रहिवाशी दाखला. (आधार कार्ड/पॅनकार्ड/ड्रायव्हिंग लायसेन्स/रेशनिंगकार्ड/मतदान कार्ड इ.)
२. पोलीस खात्यात गुन्हा नोंद नसल्याचे प्रमाणपत्र.
३. स्वत:च्या नावावर असलेल्या स्थावर/जंगम मालमत्तेचा तपशिल.
४. दोन जामिनदारांचे रु.५००/- चा एकाच स्टॅम्पपेपरवर संमतीपत्र व त्यांच्या मालमत्तेचा तपशिल.
५. प्राप्तीकर थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.
६. उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
७. बयाणा रक्कम भरलेली मूळ पावती.
८. संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेच्या नावे असलेली मालमत्ता किंवा अध्यक्ष/सचिव यांचे मालमत्तेचा तपशील तसेच आज अखेर मा.सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील मंजुर कार्यकारणीची प्रत. मागील ३ वर्षाचे ऑडिट रिपोर्ट.
९. सेवायोजना कार्यालयाचे नोंदणी कार्ड.
१०. ज्या वाणिज्य आस्थापनेसाठी निविदा सादर केली आहे, त्याबाबत अनुभवाचा दाखला.
११. राष्ट्रीयकृत बॅकेचे स्वत:च्या/संस्थेच्या नावे खाते असलेली पासबुक.
१२. स्वत:चे व जामिनदारांचे दोन पासपोर्ट आकाराचे फोटो तसेच रा.प. महामंडळाने नंतर मागणी केल्यास आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती इ.
१३. संबधीत व्यवसायाकरीता आवश्यक असणारे परवाने घेण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. वरील मुळ कागदपत्रे व त्यांचा एक साक्षांकीत केलेला संच मुलाखतीच्या वेळेस सादर करण्यात यावा, सादर न केल्यास निविदा रद्द समजण्यात येईल.

विभाग नियंत्रक
रा.प.धुळे

एस.टी.चा प्रवास, राज्याचा विकास

## पान १ वरुन

### विजयी केले ते दुसऱ्याच पक्षात विलीन होतात

ते लोकशाहीच्या भविष्यासाठी अत्यंत गंभीर आहे. अशा पद्धतींमुळे निवडणुकीतील जनादेशच निरर्थक ठरतो आणि जनतेने निवडून दिलेले सरकार सत्तेत राहत नाही.

**विधिमंडळ पक्ष विरुद्ध राजकीय पक्ष**

कपिल सिब्बल म्हणाले की, विधिमंडळ पक्ष म्हणजे राजकीय पक्ष नव्हे. हे सर्व मुद्दे आधीच स्पष्ट झाले आहेत. केवळ राजकीय पक्षाचा प्रमुखच कारवाई करू शकतो किंवा बदल करू शकतो. आमदारांच्या एका गटाने बैठकीचे आमंत्रण नाकारले आणि प्रतोदांचा अधिकार नाकारला. पक्षाच्या बैठकीला उपस्थित न राहणे आणि पक्षप्रमुखांचा अधिकार नाकारणे हे स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडल्यासारखेच आहे. सुभाष देसाई प्रकरणात घटनापीठाने स्पष्ट केले होते की, विधिमंडळ पक्षाचा एक गट गटनेता किंवा प्रतोद बदलू शकत नाही. अध्यक्षांनी तो बदल मान्यता देणे बेकायदेशीर ठरवले होते.

**बेकायदेशीर सरकारचा कार्यकाळ पूर्ण**

नवीन अध्यक्षांनी (राहुल नार्वेकर) पदभार स्विकारतानाच एकनाथ शिंदे यांना गटनेता आणि भरत गोगावले यांना प्रतोद म्हणून मान्यता दिली. या प्रक्रियेत कायदेशीर नियमांचे पालन झाले नाही. अपात्रतेच्या नोटीसांना २०२३ मध्ये उत्तरे दिली गेली. जर लवाद म्हणून अध्यक्ष वेळेत निर्णयच घेणार नसतील तर दहाव्या अनुसूचीचा काय उपयोग? या संपूर्ण बेकायदेशीर पायावर बनलेल्या सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला.

**सिब्बल पक्ष घटनेवर म्हणाले**

कपिल सिब्बल सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, शिवसेना हा निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त राजकीय पक्ष होता. बाळासाहेब ठाकरेंनंतर उद्धव ठाकरेंनी नेतृत्व स्विकारले आणि उपनेत्यांची निवड केली. पक्षाच्या घटनेतील कलम ११-अ नुसार ही माहिती निवडणूक आयोगाला देण्यात आली होती. परंतु, निवडणूक आयोग म्हणतो की २०१८ ची घटना त्यांच्या रेकॉर्डवर नाही. उद्धव ठाकरे यांची बिनविरोध निवड झाली होती आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांची नेता म्हणून नियुक्ती केली. दोन्ही बाजू हे मान्य करतात की, ज्या घटनेअंतर्गत या नियुक्त्या झाल्या, ती घटना कोणीही आव्हान दिलेली नाही. राज्यात २०१९ ते २०२२ दरम्यान उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते आणि शिंदे कॅबिनेट मंत्री होते. त्यांनी कधीही २०१३ किंवा २०१८ च्या घटनेवर प्रश्न उपस्थित केला नाही. मग निवडणूक आयोग ही घटना स्वीकारणार नाही, असे कसे म्हणू शकतो?

**नेतृत्व, बंडखोरीवर घटनाक्रम**

सिब्बल यांनी सांगितले की, शिवसेनेचे नेतृत्व उद्धव ठाकरे यांच्याकडे होते. याबद्दल कोणताही संशय नव्हता. उद्धव ठाकरेंनी पक्ष प्रमुख म्हणून एकनाथ शिंदे यांची गटनेतेपदी आणि सुनील प्रभू यांची प्रतोद म्हणून नियुक्ती केली होती. विधान परिषद निवडणुकीत २० जूनला काही आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले. त्यानंतर ३१ आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपशासित राज्यात गेले. ते आधी सुरत आणि नंतर गुवाहाटीला गेले. हे सर्व एकाच हॉटेलमध्ये राहणे हा योगायोग असू शकत नाही. एकवीस जून रोजी उद्धव ठाकरेंनी बैठक बोलावली आणि शिंदेंना गटनेतेपदावरून हटवून अजय चौधरी यांची नियुक्ती केली. एकतीस आमदार सुरतमध्ये असल्याने ते या बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत.

### एसआयआरला १७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय

नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि मतदान केंद्रांचे पुनर्रचनेचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने आयोगाने हा सुधारित कार्यक्रम जाहीर केल्याचे मानले जात आहे.

### सीजेपी राजकीय पक्ष म्हणून काम करणार नाही

पक्ष फोडले जातात. या सर्व प्रकारांमुळे जनता कमालीची त्रस्त झाली आहे प्रवक्ते सौरभ दास यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमार आणि पॅलेट गनच्या वापराचा तीव्र निषेध केला. सीजेपी पहिल्या दिवसापासून सर्व जखमी आंदोलकांना वैद्यकीय आणि कायदेशीर मदत पुरवत असल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलक मुलींच्या विरोधात सोशल मीडियावर डॉक्सिंग कॅम्पेन चालवणाऱ्या भाजप व आरएसएस समर्थकांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत संघटन वाढवण्याचा रोडमॅप, इंधन, बेरोजगारी आणि आर्थिक संकट यावर चर्चा झाली. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे सीजेपीचे मार्गदर्शक म्हणून कायम राहतील. मात्र त्यांची तब्येत बरी नसल्यामुळे ते येवू शकले नसल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत हिंगोलीहून आलेल्या शितल ढगे यांनी अभिजित दीपके यांची भेट घेतली. नीट परिक्षेत झालेल्या घोळानंतर माझ्या मुलाने आत्महत्या केली होती. त्यामुळे आमच्या मुलाला न्याय मिळावा, यासाठी मी अभिजीत दिपके यांची भेट घेतल्याचे त्यांनी माध्यमांना सांगितले. माझ्या मुलाने दररोज सोळा-सतरा तास अभ्यास करून नीटची परीक्षा दिली होती. आमच्या मुलाला आणि इतर निष्पाप विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, याच अपेक्षेने आम्ही येथे आलो आहोत, असे त्यांनी सांगितले.

### साक्रीच्या गारपीट ग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्या

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले.या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध झाल्या, संबंधित पात्र लाभार्थ्यांनी के.वाय.सी पूर्ण करण्यासंदर्भातल्या सूचना दिल्या गेल्या, के.वाय.सी देखील सर्व शेतकरी बांधवांनी केले परंतु आज तागायात तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई प्राप्त झालेली नाही. संबंधित यंत्रणेने या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाईसाठी पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या आहेत,परंतु आजतागायत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळालेली नाही.

यंदाचा पावसाळा तब्बल महिनाभर उशिरा सुरू झाला आहे पेरणीसाठी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या पैशांचा हातभार लागला असता परंतु रब्बी पिकाच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांच्या हातात खरीप हंगामातील पेरणीसाठी पैसा नसताना शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली होती तरी देखील शेतकऱ्यांनी अडचणी सहन करून पेरणी पूर्ण केली आहे.आता तरी पिकांच्या नुकसानीचे भरपाई मिळावी. अशी मागणी याप्रसंगी माजी नगरसेवक बाळा शिंदे, तसेच पंडितराव शेवाळे, दिलीप सोनवणे,अरुण लाला शेवाळे, संभाजी लकडू बोरसे,किशोर पंडीत शेवाळे, विश्वास सोनवणे,नारायण शेवाळे संजय सोनवणे विलास शेवाळे, प्रकाश शेवाळे,राजेंद्र बोरसे,निलेश शेवाळे,दयानंद बोरसे, सुनील लोटन शेवाळे, दीपक रामभाऊ सोनवणे, राजेंद्र भटू शेवाळे, नारायण धुडकू शेवाळे, पंडित दिगंबर शेवाळे, हिम्मत देवरे, प्रशांत शेवाळे, निवृत्ती शेवाळे, भाऊसाहेब देवरे, राजेंद्र गोकुळ देवरे, जितेंद्र शेवाळे, रावसाहेब सोनवणे, भटू उत्तम बोरसे, तुषार पाटील, योगेश बोरसे, सागर पवार, राहुल शेवाळे, शरद राघो शेवाळे, भास्कर शेवाळे,संजय नांद्रे,पंकज भंडारी यांनी केली आहे.

### विजय चौधरींकडून महिलांचा अपमान

कर्मचारी ला चौकशी होई पर्यंत निलंबित करावे अशी मागणीही करण्यात आली आहे. या प्रकरणाची ऑडिओ क्लिप असलेला पेन ड्राईव्ह व निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांना देण्यात आला. या प्रकरणी तातडीने दखल घेऊन कारवाई न केल्यास शिवसेना उबाठाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांचे जिल्हा प्रमुख पंडित माळी त्यांनी सांगितले की भाजपचे माजी महामंत्री विजय चौधरी यांनी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, माजी खासदार डॉ हिना गावित व रोहिणी खडसे यांचा बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अन्यथा त्यांना शहरात फिरू दिले जाणार नाही. यावेळी शिवसेना जिल्हा संघटक सुनील सोनार ,व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष, बापू महाजन ,युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाटील, युवासेना उपजिल्हाप्रमुख दिनेश भोपे, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष इम्तियाज पटेल, युवासेना जिल्हा सचिव अक्षय श्रीखंडे, युवासेना शहराध्यक्ष शेखर जाधव शेरा काजी, युवासेना उपशहर प्रमुख रोहित मराठे ,शहर संघटक भक्तवत्सल सोनार, उपशहर प्रमुख आनंदा पाटील ,जनक त्रिवेदी व शिवसैनिक उपस्थित होते.

## सोशल मीडियावर पैशांचे आमीष दाखवून परराज्यातील तरुणाची लूट

**धुळे, दि.५- सोशल मीडियावर १ लाखाच्या बदल्यात ५ लाख रुपये देण्याचे आमिष दाखवत गुजरातच्या तरुणाला अजनाळे (ता.धुळे) येथील टोळीने मारहाण केली. त्याच्याकडील एक लाखाच्या रोकडसह मोबाईल लुटून नेला. या प्रकरणी ते जणांविरुध्द धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.ध्रुव हेमंतभाई मोदी (रा. नवा वाळंज, अहमदाबाद, गुजरात) असे तरुणाचे नाव आहे.**

एक लाखाच्या बदल्यात लाख, लाखाच्या बदल्यात दहा लाख देणार अशी जाहिरात सोशल मीडियावर व्हायरल झाली. ती पाहून ध्रुव मोदी याने संबंधित व्यक्तीशी संपर्क केला. यावेळी ध्रुव मोदीला जास्त पैशांचे आमिष दाखवले. गुजरात येथून मालेगावला बोलावले. मोबाईलवर बोलत त्याचा विश्वास संपादन केला. मालेगाव येथून त्याला कुसुंबा येथील जंगलसदृश भागात निर्जनस्थळी बोलावले. तेथे आधीच दबा धरून बसलेल्या आठ ते दहा जणांच्या टोळीने ध्रुव मोदी याला शिवीगाळ करत मारहाण केली. त्याच्याकडील १ लाख रुपयांची रोकड, मोबाईलही हिसकावून घेतला.

चौकशी आणखी लूटमार करणाऱ्या काही जणांची नावे निष्पन्न झाली. या प्रकरणी ध्रुव मोदी याने दिलेल्या फिर्यादीवरून संशयित शहाजी बहादूर भोसले, प्रदीप अधिकार भोसले, दीपक इरचंद उर्फ इलीचंद चव्हाण-पवार, मनोहर कंतूलाल पवार, आशु लुकड्या पवार, शरद बहादूर भोसले व विक्की भोसले यांच्यासह अन्य चार ते पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. धुळे तालुका पोलिसांकडून तपास सुरू आहे.

दरम्यान, धुळे तालुकासह परिसरात या पद्धतीने लूटमार, चोरीचे प्रकार यापूर्वीही घडलेले आहेत. त्यावर आळा घालून कारवाई करण्याचे तालुका पोलिसांसमोर आव्हान आहे.

## अक्कलपाडा जलवाहिनीला गळती हजारो लिटर पाण्याची नासाडी



**धुळे, दि. ५ (प्रतिनिधी) : शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या अक्कलपाडा धरणावर आधारलेल्या जलवाहिनीला आज पुन्हा मोराणे गावाजवळ गळती लागली. पाण्याच्या दाबामुळे जलवाहिनीची फूट रूंद झाली आणि हजारो लिटर पाणी वाया गेले. याच भागातील कॉलन्यामध्ये पाणी शिरल्याने रस्त्यांना नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले. विशेष म्हणजे चार दिवसांपुर्वीच या ठिकाणी जलवाहिनीची दुरूस्तीचे काम झाले होते. त्यामुळे ठेकेदाराने नेमके काम काय केले, याची चौकशी महापालिका करणार आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

धुळे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी अक्कलपाडा धरणावरून जलवाहिनीने हनुमान टेकडीवरील जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी आणले जाते. त्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी टाकण्यात आली आहे. या जलवाहिनीला गळती लागली होती. त्यामुळे चार दिवसांपुर्वी या ठिकाणी विशेष दुरूस्ती करण्यात आली. जलवाहिनीच्या दुरूस्तीनंतर अवघ्या चौथ्या दिवशी जलवाहिनी पुन्हा फुटली आणि बुधवारी सकाळी मोठ्या प्रमाणात गळती झाली. हजारो लिटर पाण्याची नासाडी झाली. जलवाहिनीतील पाणी या परिसरातील कॉलन्यांमध्ये असलेल्या रस्त्यांवर गेले. त्यामुळे रस्त्यांना नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले. नागरिकांसाठी प्रतिकुल परिस्थिती निर्माण झाली आहे. चार दिवसांपुर्वी ठेकेदाराने दुरूस्तीचे काम काय आणि कोणत्या पध्दतीने केले, याची तपासणी महापालिका करणार आहे का, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## निधन वार्ता

### कमलाकर शिरुडे



धुळे, दि.५- देवपूर परिसरातील विघ्नहर्ता कॉलनी येथील रहिवासी धुळे मिलचे कामगार कमलाकर दशरथ शिरुडे-वाणी यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते प्रा.व व्यावसायिक गिरीष शिरुडे यांचे वडील होत.

### ब्रह्माकुमारी सविता दीदी



चोपडा, दि.५- प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, विरवाडाच्या संचालिका ब्रह्माकुमारी सवितादीदी यांचे आकस्मीक निधन झाले. मृत्यूसमयी त्या ३५ वर्षांच्या होत्या.त्यांचे अंतिम संस्कार गुरुवार दि.६ रोजी सकाळी १० वाजता ब्रह्माकुमारीज सेवाकेंद्र, प्रभू चिंतन भवन, ओम शांती नगर यावल रोड चोपडा येथून होईल. त्यांच्या पश्चात वडील आणि पाच विवाहित बहिणी असा परिवार आहे.

## पान १ वरुन

### एसटी-स्कुटीचा अपघात

केले. याप्रकरणी एसटी बस चालक योगेश प्रकाश सोनवणे (रा. सुलवाडे, ता. शिंदखेडा) याच्या विरोधात दोंडाईचा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बोरकुंडच्या भदाणे दाम्पत्याचा

शेतकऱ्यांचे मार्गदर्शक म्हणूनही ओळखले जात होते. कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून त्यांनी अनेक शेतकऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या मृत्यूची बातमी गावात पोहोचताच सर्वत्र शोककळा पसरली. बुधवारी गावातील अनेक व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून भदाणे दाम्पत्याला श्रद्धांजली अर्पण केली. सर्वत्र हळहळ आणि शांततेचे वातावरण होते.

आज बुधवारी सकाळी अकराला त्यांच्या घरापासून अंत्ययात्रा काढण्यात आली. ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार, शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत अत्यंत शोकाकुल वातावरणात भदाणे दाम्पत्यावर अंत्यसंस्कार झाले. अशोक भदाणे यांच्या मागे आई-वडील, एक मुलगा, एक मुलगीसह भाऊबंदकीतील मोठा परिवार आहे. राजीव प्रभाकर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कार चालक अनुराग ऐंडाईत विरुद्ध मोहाडी पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल झाला.

### सेनेचे ता.प्रमुख हेंमत पाटलांसह

शिवसेनेचे शहर प्रमुख चेतन सुरेश चौधरी (रा.वासुदेव बाबा नगर, शिरपूर) यांचा समावेश आहे. डीवायएसपी सुधीर पाटील तपास करीत आहेत.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीनुसार, तालुक्यातील अहिल्यापूर येथील संदीप गिरासे या युवकाने तापी नदीत उडी टाकून आत्महत्या केली होती. त्यापूर्वी त्याने एक व्हिडीओ तयार करुन समाज माध्यमांवर व्हायरल केला होता. त्यात काही जणांकडून त्रास झाल्यामुळे आत्महत्या करीत असल्याचे म्हटले होते. संबंधितांवर गुन्हा दाखल करावा अशा मागणीसाठी १७ जुलैला शिरपूर पोलिस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर संशयितांनी अवमानकारक वक्तव्य केल्याचा कथित प्रकार घडला.

### तळोद्यात लाच घेताना अव्वल कारकून जाळ्यात

आली असता लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर ४ ऑगस्ट रोजी सापळा रचून आरोपीला ५,००० ची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक प्रशांत भरते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केली. आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित २०१८) अंतर्गत तळोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### महामार्गावर बस अपघातात पंचवीस जखमी

येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या लक्झरी बसला (क्रमांक यु.पी.५५- टी ८४२६) एका भरधाव ट्रकने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात सुमारे २५ भाविक जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच रुग्णवाहिकेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य सुरू केले. रुग्णवाहिका चालक अनिल थोरात, डॉ. सद्दाम खान तसेच नरडाणा येथील रुग्णवाहिकेचे चालक कैलास सूर्यवंशी, डॉ. अरविंद पावरा यांनी जखमींना प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी धुळे येथील हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात दाखल केले आहे. सर्व जखमींवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या अपघातात वैधमती बसंत चौधरी (वय ४०), रामवचन यादव (६०), प्रग्या बसंत चौधरी (८) चिनक यादव (६०), राजेंद्र लखन राजपूत (६०), सुनिता सम्राट (६५), जमुनाबाई राजेंद्र राजपूत (५५), राम किशन राजपूत (४४) यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

### देव मोगरा येथील महाराष्ट्र भवनाला

प्रस्तावित महाराष्ट्र भवनाफुळे महाराष्ट्रातून येणाऱ्या भाविकांना निवास, विश्रांती, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, नंदुरबार जिल्ह्याच्या सीमेलगतच्या या महत्त्वाच्या धार्मिक स्थळाच्या पर्यटन विकासालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

**आ.चंद्रकांत रघुवंशींच्या प्रस्तावानंतर बैठक**

सागबारा येथील देव मोगरा माता मंदिर हे महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाशिवरात्री यात्रेसह वर्षभर हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. मात्र, भाविकांसाठी निवास व इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने महाराष्ट्र भवन उभारण्याची मागणी आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी शासनाकडे केली होती. त्यानंतर शासनाने या प्रस्तावाची दखल घेत कार्यवाही सुरू केली आहे.

### शेवाळीत अंमली पदार्थ जप्त

तेथे एक जण अंमली पदार्थ विक्रीसाठी थांबला असल्याचे आढळले. पोलीसांना पाहुन संशयीतरित्या हालचाली करतांना तो दिसला. पोलीस पथकाने त्यास जागीच पकडून चौकशी केली. राजकुमार मुल्कराज वाल्मीकी (वय ४२, वर्ष रा. फरीदकोट पंजाब) असे त्याचे नाव आहे.

त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात मुद्देमाल मिळाला. नशा कारक अंमली पदार्थ १.३७७ किलो ग्रॅम एम.डी. पावडर, ग्रॅम डोडा पावडर डोडा (पॉपी स्ट्रॉ-) असा एकूण २ लाख ३ हजार २५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

मानवी मेंदुवर विपरीत परिणाम करणारे दोन्ही अंमली पदार्थ आहेत. राजकुमार वाल्मीकी याच्याविरुद्ध साक्री पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कायदा कलम ८ (क), १५ (क), २२ (ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला. अधीक्षक धुळे श्री. आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक वळवी, सहाय्यक निरीक्षक संतोष मुंढे, उपनिरीक्षक प्रसाद रौंदळ, अशोक वळवी, राहुल बांगर, हवालदार, संजय शिरसाठ, शांतीलाल पाटील, अनिल शिंदे, संतोष मोरे, तुषार जाधव, मयुर चौधरी, नारायण चव्हाण, साईनाथ पवार, मंगेश खैरनार, महिला पोलीस नम्रता मगर यांनी कारवाई केली.

## कुंडाणे तांडा गावात घरफोडी; ऐवज लंपास

धुळे, दि.५- कुंडाणे तांडा (ता. धुळे) येथील घरातून चोरट्यांनी ५४ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास केला. तीन ते चार ऑगस्ट रोजी दरम्यान अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटातून सोन्या-चांदीचे काढून चोरटे पसार झाले. चोरीच्या या घटनेमुळे कुंडाणे तांडा गावात ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याप्रकरणी संतोष प्रेमचंद पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

## डॉ. जुबेर काझी यांना पीएच.डी.पदवी प्रदान



धुळे, दि.५ - धुळे जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेले केंद्रप्रमुख (उर्दू माध्यम व सोनगीर केंद्र) डॉ. जुबेर अख्तर काझी यांना छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठामार्फत डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली.

दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी डॉ.जुबेर काझी यांच्या संशोधनास पीएच.डी. पदवी बहाल करण्यात आली. हे संशोधन डॉ. जॉन चेलुदुराई, डीन, इंटरडिसिप्लिनरी स्टडीज, यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले.

डॉ. जुबेर काझी हे पंचायत समिती, धुळे येथे केंद्रप्रमुख उर्दू माध्यम, सोनगीर म्हणून कार्यरत असून शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. यापूर्वी त्यांची महाराष्ट्र सरकारच्या वतीने सिंगापूर येथे आयोजित शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली होती. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पंचायत समिती व जिल्हा परिषद धुळे येथील सर्व अधिकारी वर्ग, डायटचे अधिकारी, शिक्षक, सहकारी, विद्यार्थी, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. जुबेर काझी हे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी काझी शाकीरुद्दीन यांचे सुपुत्र असून त्यांचे धाकटे बंधू काझी उझैर अहमद हे स्वित्झर्लंडमधील विद्यापीठात पीएच.डी.चे संशोधन करत आहेत. त्यामुळे काझी कुटुंबाची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध होत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.


## २२ वे पुण्यस्मरण



**कै. दादासो. विष्णू निवृत्ती इंगळे**

(स्वर्गवास- दि. ६/८/२००४)

**तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली व सुमनांजली!**

✽ शोकाकुल ✽

श्रीमती कमलबाई विष्णुपंत इंगळे

श्रीमती उषाबाई शिवाजी इंगळे — श्रीमती प्रभावती यशवंत इंगळे
श्रीमती शोभना विजय इंगळे — श्रीमती सुनिता संजय इंगळे
राजेंद्र विष्णू इंगळे — सौ. वंदना राजेंद्र इंगळे
अजय विष्णू इंगळे — सौ. निता अजय इंगळे
विशाल विष्णू इंगळे — सौ. ज्योती विशाल इंगळे
अजिंक्य राजेंद्र इंगळे — सौ.कृतिका अजिंक्य इंगळे
समीर विजय इंगळे — सौ.सविता समीर इंगळे

पियुष, आशिष, सायली, वैष्णवी, नेहा, निशांत, कृष्णा, रुद्र,ध्रुवांश

व समस्त इंगळे परिवार, धुळे.

**पाहिजेत**

TATA ACE & TATA Intra गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे. लायसन्स असणे आवश्यक.
– भेटा –
श्री.किसन बेवरेजेस
8329197936
8380091735

**विकणे आहे**

विकास कॉलनी साक्रीरोड MSEB ऑफिस मागील ३५०० स्केअर फूट ३००० स्केअर फूट बांधकाम ४ प्लॉट बंगला योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
– संपर्क –
9421890419
9579438167

**पाहिजेत**

१) बेकरीच्या मालाच्या वाटपसाठी Salesman माणूस पाहिजे. लिहता, वाचता आणि हिशोब करता येणे आवश्यक.
२) TATA ACE (छोटा हत्ती) गाडी चालवण्यासाठी ड्राइव्हर पाहिजे. License असणे आवश्यक.
- भेटा -
लाईफ लाईन बेकरी
यल्लमा देवी मंदिरासमोर, मालेगाव रोड, धुळे
7507699616

**पाहिजेत**

औषधांच्या एजन्सीसाठी खालील पदे त्वरीत भरणे आहे.
१) सेल्समन व एजन्सी कामासाठी - ०२
२) दुकान कामासाठी - २ पदे (दुचाकी चालवता येणे आवश्यक)
वेळ - स.११ ते सायं ७ पर्यंत
प्री अॅण्ड जी सेल्स कॉर्पोरेशन
गल्ली नं ४, अलंकार शॉपी समोर, धुळे
02562 - 282560

**पाहिजेत**

देवपूर परिसरात पेट्रोल पंपसाठी फिलर आणि सुपरवायझर पाहिजे. (महिलांना प्राधान्य)
-: संपर्क :-
9763389999

**पाहिजेत**

• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**दुकान विकणे आहे**

मुख्य बाजारपेठ मधील गल्ली नं.४ येथील बालाजी मंदिरासमोर क्षेत्र (१०.०१) चौ.मी दुकान योग्य किंमतीत विकणे आहे.
– संपर्क –
8830291946

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
Japan Premium



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागू
श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०